
गुरुवार, ११ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १४७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 11 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-147 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05



कुलस्वामी, लोकदैवत जेजुरी खंडोबाच्या जयाद्री मल्हार कळसाला साक्षात सूर्यनारायणाने आपल्या मावळत्या किरणांनी जणू अभिषेक केला आहे, असे हे बदलत्या वातावरणातील अद्भुत दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# शिंदे सरकार बरकरार !

## खरी शिवसेना एकनाथ शिंदेंचीच, सर्वच आमदार पात्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेला निकाल अखेर बुधवारी घोषित झाला असून विधानसभेतील बहुमत व 1999 मधील शिवसेनेच्या घटनेआधारे खरी शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच आहे, असा निर्वाळा विधानसभा अध्यक्ष राहुल नॉर्वेकर यांनी दिला आहे. तसेच दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध केलेल्या आमदार अपात्रतेच्या याचिका फेटाळण्यात आल्या असून सर्वच आमदार पात्र ठरवले आहेत.**



राहुल नार्वेकर म्हणाले की, दोन्ही गटांकडून शिवसेनेची घटना मागवून घेतली होती. उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या घटनेवर तारीख नव्हती, म्हणून त्यांनी दिलेली घटना वैध नाही. १९९९ साली निवडणूक आयोगात दाखल केलेली घटना वैध आहे. २०१८ साली घटनेत केलेले बदल निवडणूक आयोगाला न कळवल्याने ते बदल देखील वैध नाहीत. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेल्या घटनेची प्रत ही शिवसेनेची खरी घटना आम्ही ग्राह्य धरली आहे. पर्यायाने ठाकरेंनी दिलेली घटना वैध नसल्याचे नार्वेकर यांनी सांगितले. कोणता गट हा खरा पक्ष आहे, हे ठरवण्यासाठी २०१८ ची घटना ही मोजपट्टी मानता येणार नाही. त्यामुळेच विधीमंडळातील बहुमताचा विचार करून कोणता गट हा खरी शिवसेना आहे, याचा निर्णय घेत आहे. बहुमत हे एकनाथ शिंदे गटाकडे आहे आणि त्यामुळे त्यांना मूळ राजकीय पक्ष म्हणून मान्यता देत आहे. खरी शिवसेना कुणाची हे ठरवताना शिवसेना पक्षाची घटना, निवडणूक आयोगाचा निकाल आणि पक्षातील बहुमत हे महत्त्वाचे आहे, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल वाचनाच्या सुरूवातीलाच स्पष्ट केले. तसेच गेल्या तीन महिन्यात दोन्ही गटाच्या वतीने झालेल्या युक्तिवादाची माहितीही नार्वेकर यांनी दिली.

महत्त्वाची बातमी

## वनरक्षकांची १२५६ पदे भरली जाणार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** वनरक्षक होण्याचे आणि सरकारी नोकरी करण्याचे तुमचे स्वप्न आता पूर्ण होऊ शकते. थेट वनरक्षकांची १२५६ पदे भरली जाणार आहेत. ही एकाप्रकारची मेगा भरतीच आहे. ही प्रक्रिया राबवण्याचा निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात आला असून सदर प्रक्रिया वेगात पूर्ण करण्याचे निर्देश वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत. ही भरती प्रक्रिया गेल्या काही दिवसांपासून खोळंबली होती. मात्र, आता यामधून मार्ग काढत उमेदवारांना मोठा दिलासा देण्यात आला. एकूण २१३८ वनरक्षक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या २१३८ वनरक्षक पदांसाठी २ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२३ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने टीसीएस आयओएनमार्फत परीक्षा घेण्यात आली होती. मात्र, अनुसूचित क्षेत्रातील शासकीय पदभरती प्रक्रियेस सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने सर्वच पदभरती प्रक्रिया बाधित झाली. त्यामुळे सर्वच भरतीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये अस्वस्थता पसरली होती. शेवटी यामधून मार्ग निघाला असून खोळंबलेल्या पदभरती प्रक्रियेस आता चालना मिळाली आहे. त्यानुसार शासनाने अनुसूचित क्षेत्र (पेसा) सोडून उर्वरित १२५६ वनरक्षक पदांची भरती करण्यास मान्यता दिली.

# यळकोट यळकोट जय मल्हारच्या जयघोषाने माळेगाव यात्रेला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदे गड जेरुरी अशा जयघोषात येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत, बेलभंडाऱ्याची उधळण करीत पारंपारीक पद्धतीने यंदाही माळेगावच्या श्रीखंडोबा रायाच्या यात्रेस बुधवारी शुभारंभ झाला आहे. यावेळी लाखो भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. खंडोबाच्या व मानकऱ्यांच्या पालखीचे प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय विश्रामगृहावर जिल्हा परिषदेच्या वतीने मानाचा फेटा, शाल श्रीफळ व मानधन देवून स्वागत करण्यात आले. प्रारंभी सकाळी शासकीय पुजा करण्यात आली. त्यानंतर दुपारी पालखी पुजनानंतर देव स्वारी काढण्यात आली. यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, माळेगावच्या सरपंच कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ संतोष तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा माळेगाव यात्रा सचिव मंजूषा कापसे, नारायण मिसाळ, रेखा काळम-कदम, अमित राठोड, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊवार, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रणिताताई देवरे- चिखलीकर, चंद्रसेन पाटील, पुरुषोत्तम धोंडगे, व्ही.आर. बेतीवार,




कार्यकारी अभियंता अमोल पाटील, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. बोधनकर, रोहित शिंदे, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार लाड, गट विकास अधिकारी अडेराघो आदींची उपस्थिती होती.

**मानकऱ्यांचा गौरव :** पालखीचे मानकरी गणपतराव मल्हारी नाईक (रिसनगाव), गोविंदराव नागेशराव महाराज (कुरुळा), व्यंकटराव मारोतीराव पांडागळे (शिराढोण), खुशाल भगवानराव भोसीकर (पानभोसी), गोविंदराव बाबाराव नाईकवाडे (पानभोसी), पांडुरंग नारायणराव पाटील (माळेगाव), मल्हारी रावसाहेब पाटील (माळेगाव), विजयकुमार शंकरराव कनकंदडे (आष्टुर) या मानकऱ्यांचा जिल्हा परिषदेच्या वतीने फेटा बांधून गौरव करण्यात आला.

**खंडोबा यात्रेत वाघ्या-मुरळी :** उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदे गड जेजूरी उत्तराची जेजूरी गडाला नऊ लाख पायरी असा घोष करत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करते. पारंपारीक पद्धतीने कवड्याच्या माळी, लांब हळदीचा मळभट, हातापायावर चाबकाचे फटके मारत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करत असते. या वाघ्या मुरळीला पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# ते चाळीस दिवस. ..

आधुनिक केसरी

या चार छोट्या मुलांमध्ये होती लेस्ली नावाची एक तेरा वर्षांची मुलगी. तिच्यासोबत होती तिची तीन लहान भावंडं. सोलेनी वय वर्ष नऊ, टिएन वय वर्षे फक्त चार आणि लहानगी क्रिस्टीन. क्रिस्टीन तर अगदीच कोवळी. जेमतेम एक वर्षाची. अपघातातून बचावले तरी जिवंत राहणे या मुलांसाठी सोपं नव्हतं. नियती जणू त्यांची कठोर परीक्षा घेत होती. अमेझॉनच्या जंगलाचं नुसतं नाव जरी काढलं तरी भल्याभल्यांचा थरकाप होतो एवढं हे भयानक जंगल. या जंगलात दिवसाही सूर्यप्रकाश सगळीकडे पोहोचू शकत नाही एवढं ते घनदाट आणि उंच. जंगलामध्ये हिंस्त्र प्राण्यांचा सुळसुळाट. डास, विषारी कीटक, साप यांचा वावर. जवळपास कोणतीही मानवी वस्ती नाही. मदत मिळण्याची शक्यता नाही. भरीत भर म्हणजे हे जंगल तस्करांचा आणि दहशतवाद्यांचा अड्डा. अशा या जंगलात ही कोवळी पोरं आपल्या आयुष्याशी झुंजत होती. अपघात घडल्याचे कळल्यानंतर कोलंबियामध्ये एकच हलकल्लोळ उडाला. कोलंबिया सरकारने विमानाचा शोध घेण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरु केली. तेथील पोलीस दल, सैन्यदल आणि बचाव पथकाची माणसं या विमानातील माणसं, मुलं कुठे आढळताहेत का याचा नियोजितपणे शोध घेऊ लागले. शोधकार्यात अमेझॉनच्या घनदाट जंगलामुळे अनेक अडथळे येत होते. पण नेटाने शोध घेणे सुरूच होते. अखेर झाडावर अडकलेले विमान शोधपथकाला सापडले. विमान अपघातात ठार झालेल्या व्यक्तींचे मृतदेह मिळाले. पण ती चार चिमुकली बालके मात्र कुठे आढळत नव्हती. सगळ्यांना चिंता आणि उत्सुकता होती ती त्यांची. हे बचावकार्य अक्षरशः चाळीस दिवस चालू होते. अतिशय घनदाट असे अमेझॉनचे जंगल ही माणसे पिंजून काढत होती. जमिनीवर म्हणजेच प्रत्यक्ष जंगलात जाऊन शोध घेणारी बचावपथके होती तशीच हेलिकॉप्टरचा वापर करून आकाशातूनही शोध घेणे सुरु होते. इच्छा असली की मार्ग दिसतोच. या शोध पथकाने मुलांच्या आजीकडे जाऊन तिच्या आवाजात आणि त्या मुलांच्या स्थानिक भाषेत एक ऑडिओ मेसेज रेकॉर्ड केला. त्या ऑडिओत आजी म्हणत होती, '




बाळांनो, आहेत तिथेच थांबा. आम्ही तुमचा शोध घेतोय. तुम्ही आम्हाला हवे आहात. आम्ही तुमची वाट पाहतोय.' हा आजीच्या आवाजातील संदेश ती शोधपथके मुलांसाठी मोठ्या आवाजात प्रक्षेपित करत होती. ती मुले एकाच ठिकाणी थांबावी आणि त्यांना शोधणे सोपे जावे हा उद्देश होता.



## आनंदी पहाट

# भविष्यातील योग आपल्या विचारांवर आधारित

आधुनिक केसरी

दैनंदिन आयुष्यांत स्वतःच्या अशा कितीतरी प्रकारच्या, आपलं जीवन जगण्याच्या, नवनवीन कल्पना आपल्या मनांत असतात. प्रत्येकालाच असं वाटत असतं कि, आपलं आयुष्य इतरांपेक्षा निराळं असावं. जगानं कौतुक करावं असंच आपलं जीवन असावं, आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावं. इतरांपेक्षा मी आणि माझी प्रत्येक गोष्ट भिन्न असण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असते. त्यासाठी बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागतो. आपल्यापैकी अनेकांना त्यांच्यात असलेल्या उणिवांच्या जाणिवाच होत नाहीत. खरं तर, आपल्यातील उणिवा दूर करून जाणीवा जपण्याची जरुरी असते आणि जपलेल्या जाणिवांना नेणीवेपर्यंत घेऊन जाण्याची जरुरी असते, हे प्रत्येकानं समजून घेतलं पाहिजे. अनेकजणांना आपल्यांत उणिवा आहेत हे जाणूनच घ्यायचं नसतं, मान्य नसतं. आपण वर्तमानांत आपलं जीवन जगत असताना खरं तर सद्यःस्थितीचा, नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणं आवश्यक असतं. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असं केलं होतं, तसं केलं होतं. त्या भूतकाळातल्या घटनांचं आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचं भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असतं. वर्तमानातल्या मी चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? (कोणत्या कारणाने?) ह्याचा प्रकर्षानं, प्राधान्यानं, सातत्यानं आणि साकल्यानं अभ्यासपूर्वक विचार करत राहणं गरजेचं असतं. आपल्या भविष्यातील योग हे नशिबावर नाही तर आपल्या विचार, वर्तन, व्यवहार ह्यांवर अवलंबून, आधारलेले असतात ह्याची जाणीव होणं आवश्यक असतं.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## सार नेटका | होतो जाण ||

संसार पसारा | आवरावा कैसा ||
आशेचा वळसा | घात करी ||१||
सुटता सुटेना | विकारांची गाठ ||
दुःख काही पाठ | सोडियना ||२||
असंगाशी संग | नेमका घडतो ||
म्हणूनी नडतो | संसार हा ||३||
पूर्व पुण्याईने | सापडते वाट ||
ओळखावा घाट | प्रारब्धाचा ||४||
सोड पाश सारे | होईल सुटका ||
संसार नेटका | होतो जाण ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

ऐसा दुःखें दगदला । मग विदेशाप्रती गेला ।
पुढे प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ॥५४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्वगुणपरीक्षानाम समास चवथा ॥४॥
पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासंगासी ।
आपल्या जिवेसीं सोसी । नाना श्रम ॥१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

क्षुधा तृषा निन्दा स्तुति, सुख दुख समता जाहि । हानि लाभ शीतोष्ण में, कहत तितिक्षा ताहि ।।१२८।।
भोजन निद्रा नेम करि, नहिं अधिकी नहिं घाट । कुसमय काल में दृढ़ रहो, मिलै कर्म ये साट ।।१२९।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१२८, १२९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : तहान-भूक, निंदा-स्तुती, सुख-दुःख, हानी-लाभ तसेच थंडी-गर्मी अशा सर्व प्रकारच्या द्वंद्वांमध्ये एकसमान भाव ठेवत स्थिर राहाणे, विचलीत न होणे याला तितिक्षा असे म्हणतात. साधकांसाठी आणि प्रभू भक्तांसाठी हे आवश्यक आहे की, त्यांनी विपरीत समय आल्यावर अविचल राहून आपल्या साधनेत आणि प्रभू भक्तीत दृढ राहावे, चिंतीत होऊ नये. आपली कर्मफळं अवश्य मिळतात आणि मिळणारच, हा दृढ विश्वास ठेवावा.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ६०वे


आता फार कमी दिवस राहिले । असेच सारखे गीतामाईस वाटू लागले । मग मनोमन त्यांनी ठरविले । करावे शरयू स्नान, घ्यावे अखेरचे दर्शन रामरायाचे ।। १ ।।
श्रीमहाराजांनी आईच्या इच्छेनुसार केले । शरयू तिरी स्नान घातले । टाकली गादी घाटावरी, आईस बसविले । म्हणे,
आई, कर तू दान धर्म आता ।। २ ।।
गादीखाली गीताबाई हात घालती । तो मुठभरुन रुपये येती । जो जो येई त्यास मुठभरून रूपये देती । अचंबित होती गीतामाय ।। ३ ।।विचारती त्या लेकाला । गणू, गादी खाली खजिना कसा आला ? । ही विद्या येते तुला, नाही कधी बोलला । म्हणे श्रीमहाराज, "स्व साठी नाही उपयोगाची ही, म्हणून कधी सांगितले नाही तुला ।। ४ ।।
भरभरून दानधर्म केला । गीतामाईच्या मनास संतोष जाहला । रामाला नैवेद्य दाखवला । दिले गावजेवण, आईस थोडा प्रसाद दिला ।। ५ ।।
दुपारी विश्रांती झाली । श्रीमहाराज आईला विचारती- सांग काय ईच्छा राहिली ? । आई म्हणे- आता ईच्छा एकच उरली। राम राम म्हणत , तुझ्या मांडीवर मला जाऊ दे ! ।।६ ।।


अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगांत संत ऐसें वर्तती ॥

आधुनिक केसरी

जेथें मीपणाचें ठाणें । तेथें दुःखाचें साम्राज्य असणें । हा आहे नियम । म्हणून मी सांगतों राखावा नेम ॥ सर्वस्वीं व्हावें भगवंताचें। ' मी, माझें ' सोडून साचें ॥ बाह्य मीपणानें जरी सोडलें । पण अभिमानानें वृत्ति बळावली । तेथें घाताला सुरुवात झाली ॥ बुद्धि करावी स्थिर । नामीं असावें प्रेम अनावर । राम कर्ता हें जाणून चित्तीं । जगांत संत ऐसें वर्तती ॥ साधनीं सावधान जाण । हेंच साधकाचें मुख्य लक्षण ॥ बाह्य वेषानें कसाहि नटला । जगाला भुलविता झाला । तरी जोंवरी नाहीं चित्त स्थिर । कसा पावेल रघुवीर ? ॥ आजवर केल्या गोष्टी फार । भल्या बुऱ्या असतील जाण । त्याचा न करावा विचार । पुढें असावें खबरदार ॥ मानावी परस्त्री मातेसमान । दुसऱ्याचें न पाहावें उणेंपण । परनिंदा टाळावी । स्वतःकडे दृष्टि वळवावी ॥ गुणांचें करावें संवर्धन । दोषांचें करावें उच्चाटन । याला एकच उपाय जाण । अखंड असावें अनुसंधान ॥
प्रपंच न मानावा सुखाचा । तो असावा कर्तव्याचा ॥ वृत्ति असावी स्थिर । चित्तीं भजावा



रघुवीर ॥ असा करा कांहीं नेम । जेणें जवळ येईल राम ॥ प्रपंचाची धरितां कांस । दुःखचि पावे खास ॥ प्रपंच हाच आधार । प्रपंचाविण निराधार । ऐशी होई ज्याची वृत्ति । समाधान न ये त्याचे हातीं । तुम्ही सुज्ञ भाविक जाण । एवढें ऐकावें माझें वचन ॥ दुष्ट मतीची उत्पत्ति । ही दुर्जनाची संगति । भावें धरितां रघुपति । सर्व संकटें दूर जाती ॥ वृत्ति असावी खंबीर । ज्याचा आधार रघुवीर ॥ दुर्जनांचें जैसें मन । पाषाणास न फुटे द्रव जाण । तैसें प्रपंचीं इच्छी जो सुख । जें आजवर कोणास न मिळाले देख ॥ प्रपंचाचें दुःख जाण । तें मीपण असल्याची खूण जाण ॥ जगांत वर्तावें, घरांत असावें । व्यवहारांत व प्रपंचांत वागावें । परि न कोठें गुंतावें ॥ फार दिवसांचा वृक्ष झाला । घरांतील घडामोडी दिसती त्याला । जैसें तो न सोडी आपलें स्थान । तैसें वागावे आतां आपण ॥ ज्याचे घरीं रामाचा वास । तेणें न राहावें कधीं उदास ॥ सदा राखावें समाधान । मुखीं भगवंताचें नाम ॥ आतां प्रेम ठेवा नामीं । कृपा करील चक्रपाणी ॥ आतां करा चित्त स्थिर । हृदयीं धरा रघुवीर ॥ रामावांचून न आणावा विचार । हाच माझा आशीर्वाद ॥

**२१२. जेथे नाम तेथे राम । हा ठेवावा विश्वास । कृपा करील रघुनाथ खास ॥**



पुण्यातील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर आपल्या विविध मागण्यांसाठी डी टी एड बी एड स्डुडंट असोसिएशनच्या वतीने बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले आहे. पवित्र पोर्टलद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था मधील इंग्रजी माध्यमाच्या पदविका शिक्षकांना नियुक्त करण्याबाबतचे पत्रक तात्काळ रद्द करून गुणवत्तेनुसार शिक्षक भरती करण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. आज त्यांची भेट घेऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच त्यांच्या मागण्यांबाबत शिक्षक आयुक्तांबरोबर बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हा कार्याध्यक्ष महादेव कोंढरे, असोसिएशनचे पदाधिकारी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# लोकशाही मराठी वृत्तवाहिनीवरील बंदी उठवा : पत्रकार संघ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोकशाही मराठी वृत्तवाहिनीवरील बंदी उठवावी, अशी मागणी आज धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. तसेच सरकारचा निषेधही यावेळी व्यक्त करण्यात आला. माहिती व जनसंपर्क विभागातर्फे 'लोकशाही मराठी' चे प्रक्षेपण काल मंगळवार, दि.९ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजेपासून बंद करण्यात आले आहे. कागदपत्रांची पूर्तता या सबबीखाली प्रक्षेपण बंद करण्याचे आदेश चॅनलला दिले. खरे तर लोकशाहीची ही एकप्रकारे गळचेपी आहे. तसेच माध्यमांवर ही मुस्कटदाबी आहे, असा आरोप पत्रकार संघटनेने केला आहे. कागदपत्रांची पूर्तता ही चॅनल ऑनर असूनदेखील करू शकतात, त्यासाठी ३० दिवसांसाठी चॅनल बंद करणे हा काही पर्याय नाही. चॅनलच्या माध्यमातून लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचा तसेच विविध क्षेत्रातील सत्यसमोर आणण्याचे धाडस 'लोकशाही मराठी'ने केले होते. कदाचित, यामुळेच चॅनलचे प्रक्षेपण थांबवण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रवृतीचा निषेध म्हणून धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आल आहे.

# लोणारचे महत्त्व लक्षात घेऊन विकासकामे दर्जेदार करावीत : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जानेवारी बुलडाणा जिल्ह्यात खाऱ्या पाण्याचे जगप्रसिद्ध लोणार सरोवर असून याठिकाणी देश-विदेशातून पर्यटक येत असतात. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखालील लोणार सरोवर विकास आराखडा समितीच्या माध्यमातून विकास आराखड्याच्या कामांची अंमलबजावणी सुरु आहे. पर्यटन स्थळाचा 'अ' दर्जा प्राप्त असलेल्या लोणार परिसरात जागतिक दर्जाच्या पर्यटन सोयी-सुविधा द्याव्यात. लोणार विकास आराखड्याची अंमलबजावणी करताना त्यातील कामे जागतिक दर्जाची करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात लोणार विकास आराखड्याबाबत बैठक झाली. बैठकीला सहकार मंत्री तथा बुलडाणा जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, आमदार डॉ. संजय रायमूलकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक पुरातत्वविद डॉ. अरूण मलिक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा, पर्यटन विभागाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अमरावती विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे, बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. लोणार विकास आराखड्याबाबत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, लोणार सरोवराचे हेरिटेज महत्त्व लक्षात घेऊन या परिसरातील विकासकामे दर्जेदार होतील याची काळजी घ्यावी. सरोवराजवळ वन्यजीव अभयारण्य आहे. याठिकाणी लावण्यात येणाऱ्या संरक्षण जाळ्या, प्रसाधनगृहे, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासारख्या पायाभूत सुविधा या वारसा स्थळाला शोभणाऱ्या, साजेशा असाव्यात. पशुपालक तारेच्या संरक्षण जाळ्या तोडून जनावरे घेऊन आत चरायला जाऊ नयेत, याचीही काळजी घ्यावी. लोणार विकास आराखड्यासाठी संवर्धन वास्तुविशारद (कन्झर्व्हेटिव्ह आर्किटेक्चर) नियुक्त करावा. यासाठी भारतीय पुरातत्त्व विभागाची मदत घ्यावी. याबाबत न्यायालयाला अवगत करावे असेही सांगितले.

सरोवराच्या संरक्षण भिंती हेरिटेज दर्जानुसार असल्या पाहिजेत. विभागीय आयुक्तांनी कामांच्या दर्जाबाबत दक्षता घ्यावी. राज्य शासन लोणार सरोवर विकास आराखड्यासाठी आवश्यक निधी देत आहे. मात्र, त्यातून होणारी कामे जागतिक दर्जाची असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासनाने हेरिटेज कामांचा अनुभव असणाऱ्या सक्षम वास्तुविशारदास नेमून जागतिक दर्जाच्या कामांचा समावेश असणारा आराखडा एक महिन्याच्या आत सादर करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

# नागरी भागात आता बाल विकास केंद्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कुपोषणावर मात करण्यासाठी राज्यातील नागरी भागात ग्रामीण बाल विकास केंद्र योजनेच्या धर्तीवर नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांसाठी नागरी बाल विकास केंद्र योजना सुरू करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यात ग्रामीण भागामधील अतितीव्र कुपोषित बालकांच्या कुपोषणावर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने अंगणवाडी स्तरावर ग्राम बालविकास केंद्र योजना कार्यान्वित आहे. राज्यात नागरीकरणाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या नागरी भागात राहत असल्याने नागरीकरण क्षेत्रातील अंगणवाड्यांमध्ये अतितीव्र कुपोषित बालकांच्या संख्येत देखील वाढ होत असून ग्राम बाल विकास केंद्राच्या धर्तीवर नागरी बालविकास केंद्र सुरु करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील राज्यातील 104 नागरी प्रकल्पांमध्ये ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेसाठी वार्षिक अंदाजे 11.52 कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली असून प्रती वर्ष अतितीव्र कुपोषित बालकांच्या संख्येनुसार येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. राज्यातील पेढी बॅरेज मध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजना या प्रकल्पातंर्गत बाधित होणाऱ्या मौजे रोहणखेड व मौजे पर्वतापूर, जि. अमरावती आणि कोथेरी लघुपाटबंधारे ता. महाड, जि.रायगड या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या शिरगाव येथील प्रकल्पबाधीत कुटुंबांना विशेष बाब म्हणून आर्थिक पॅकेज देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यामध्ये १ जानेवारी २०१४ पुर्वीच्या व पुनर्वसन अधिनियम, १९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पातंर्गत बाधित गावठाणातील प्रकल्पबाधित कुटुंबांना घराच्या बांधकामाचा खर्च, सर्व नागरी सुविधा विकसित करण्यासाठी लागणारा खर्च व स्थलांतरीत करतांना देय असलेले भत्ते यापोटी खालील प्रमाणे आर्थिक पॅकेज अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ज्या बाधित गावठाणांसाठी नवीन गावठाण विकसित झालेले असेल परंतु प्रकल्पग्रस्त स्थलांतरीत झालेले नाही, अशा प्रकरणी जे प्रकल्पग्रस्त आर्थिक पॅकेज घेतील त्यासाठी तयार करण्यात आलेला भूखंड लिलाव करून त्यामधील उत्पन्न प्रकल्पाच्या संस्थेला (ज्यांनी प्रकल्पासाठी खर्च केला असे) परत करण्यात येईल. पेढी बॅरेज मध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजना या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या मौजा रोहणखेड व मौजा पर्वतापूर ता. जि. अमरावती या गावातील तसेच कोथेरी लघुपाटबंधारे योजना, ता. महाड, जि. रायगड या प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या शिरगांव येथील प्रकल्पबाधित कुटुंबांना विशेष बाब आर्थिक पॅकेज म्हणून मंजूरी देण्यात आली आहे. या दोन्ही प्रकल्पांना आर्थिक पॅकेजसाठी आवश्यक रक्कमेची परिगणना करणे, निधी उपलब्ध करणे आणि अंमलबजावणी करणे या बाबी प्रकल्प यंत्रणा जलसंपदा विभाग यांनी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**सत्यशोधक मराठी चित्रपटास राज्य वस्तू व सेवा करातून सूट :** सत्यशोधक मराठी चित्रपटास राज्य वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत आकारल्या जाणाऱ्या राज्य वस्तू व सेवा कराच्या प्रतिपूर्तीस मंजुरी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शिक्षण आणि सामाजिक प्रेरणादायी विचारांना चालना देणारा हा चित्रपट मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांसह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पहावा यासाठी विशेष खेळाचे आयोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिल्या.

सत्यशोधक हा मराठी चित्रपट शिक्षण आणि सामाजिक समतेच्या मूल्यांना चालना देणारा आहे. या चित्रपटात महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिजोती सावित्रीबाई फुले यांचे जीवन, महिला आणि अस्पृश्य यांच्या शिक्षणासाठीचे त्यांचे अमुल्य योगदान व त्यांच्या परिश्रमाची कथा दाखविण्यात आलेली आहे. अशाप्रकारे जनमानसात योग्य तो सामाजिक संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न या चित्रपटाद्वारे करण्यात आलेला आहे.

चित्रपटाच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रेरणादायी पैलुंचा विचार करता तो सर्वांना पाहता यावा यासाठी प्रोत्साहन म्हणून आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चित्रपटगृहांनी या चित्रपटाच्या तिकीट दरावर लागू असलेला राज्य वस्तू व सेवाकर (एसजीएसटी) 30 एप्रिल, 2024 पर्यंत कालावधीत प्रेक्षकांकडून वसुल न करता स्वत: राज्य शासनाच्या तिजोरीत भरणा करण्यासाठी मंजूरी देण्यात आली. तिकीट विक्री वरील शासन तिजोरीत भरणा केलेल्या राज्य वस्तू व सेवाकराचा (एसजीएसटी) परतावा देण्यास यावेळी मंजुरी देण्यात आली.



# अग्निवीर भरतीत बदल

आधुनिक केसरी

गेल्या काही दिवसांपासून बारावी आणि दहावी पास असलेल्या उमेदवारांसाठी विविध भरती प्रक्रिया राबवल्या जात आहेत. रेल्वे विभागात देखील मेगा भरती सुरू आहे. ही मेगा भरती शिकाऊ उमेदवारांसाठी आहे. वायुसेनेत देखील विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी मोठी संधी आहे. भारतीय लष्कराने एक अत्यंत मोठा निर्णय घेत थेट अग्निवीर भरती प्रक्रियेला सुरूवात केली. सुरूवातीला या निर्णयाचा जोरदार विरोध देखील झाला. आता भारतीय लष्कराने अग्निवीर भरती प्रक्रियेत मोठा बदल केला आहे. हा बदल २०२४ -२५ च्या भरती प्रक्रियेसाठी लागू असणार आहे. नुकताच यासंदर्भातील अधिसूचनाही ही प्रसिद्ध करण्यात आली. विशेष म्हणजे हा नवा नियम लिपिक आणि स्टोअरकीपर पदांसाठी होणाऱ्या भरती प्रक्रियेसाठी लागू करण्यात आलाय. या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी ही अत्यंत महत्वाची बातमी आहे. विशेष म्हणजे हा नियम इतर भरती प्रक्रियेसाठी लागू नसणार आहे. सेना लिपिक आणि स्टोअरकीपर पदांच्या भरती प्रक्रियेसाठी हा नियम असेल. यामध्ये या दोन्ही पदांसाठी उमेदवारांना टायपिंग चाचणी द्यावी लागणार आहे. अगोदरच्या नियमानुसार टायपिंग चाचणी देण्याची गरज नव्हती. मात्र, आता त्या नियमामध्ये बदल करण्यात आलाय. या टायपिंग चाचणीमध्ये उमेदवाराला हिंदीमध्ये ३० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजीमध्ये ३५ शब्द प्रति मिनिटप्रमाणे ही चाचणी पार पडू शकते. काही सेना अधिकाऱ्यांनी याबद्दलची पुष्टी देखील केली आहे. मात्र, अजून या टायपिंग चाचणीचे मानक हे ठरवण्यात नाही आले. याबद्दलचे अपडेट देखील लवकरच पुढे येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी ही मोठी संधी आहे. या भरती प्रक्रियेसाठी बारावी पास असलेले उमेदवार हे अर्ज करू शकतात. सतत भरती प्रक्रियेबद्दल बदल हे केले जात आहेत. लेखी परीक्षा होईल आणि त्यानंतर भरती मेळावा आयोजित केला जाईल. आता हा टायपिंग चाचणीचा देखील यामध्ये समावेश होणार आहे.

# राजकीय बॅनरबाजीवर चाप केव्हा ?



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**काहीनाकाही निमित्त साधून राजकीय पक्षांकडून नाक्यानाक्यांवर होर्डींग्स, बॅनर्स आणि फलक लावणे आता नित्याचे झाले आहे. केवळ शहरांतच नव्हे तर ग्रामीण भागातही ही क्रेझ आज कायम आहे. पालिका प्रशासन, नगर परिषदा एकीकडे नगर-शहरांचे आणि गावांचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, तर दुसरीकडे रस्त्यांवर होर्डिंग्स लावून परिसर बकाल करण्यामध्ये राजकीय पक्षांत चढाओढ लागलेली पहायला मिळते आहे. मुंबई विद्रूप करणाऱ्या राजकीय बॅनरबाजीवर थेट उच्च न्यायालयानेच बंदी घातली आहे.**



तरीही बँनरबाजी करणाऱ्या मंडळींवर तिळमात्र फरक पडलेला नाही. सण, उत्सव जवळ आले कि ही बॅनरबाजी जोमात असते. गणेशोत्सव, नवरात्री उत्सव यानिमित्ताने लावण्यात येणाऱ्या होर्डिंग्सवर उत्सवाच्या प्रमुख देवतांची चित्रे लहान तर शुभेच्छा देणाऱ्या मंडळींचे चेहरे भलेमोठे छापलेले असतात. नाक्यांवर लावण्यात येणारे बहुतांश होर्डिंग्स आणि बॅनर्स विनापरवाना लावलेले असतात. पुढाऱ्यांतील कलह आणि राजकीय पक्षांतील वादही बऱ्याचदा या बँनरबाजीतून चव्हाट्यावर आणले जातात. त्यांना उत्तर देण्यासाठी पुन्हा दुसऱ्या पक्षाकडून बँनरबाजी केली जाते. अनधिकृतपणे केलेल्या बँनरबाजीवर सुद्धा अनेकदा या राजकीय मंडळींकडून अधिकार दाखवले जातात. अनधिकृत होर्डिंग्स आणि बॅनर काढण्यासाठी गेलेल्या पालिका कर्मचाऱ्यांवर पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण झाल्याचे प्रसंगही मुंबईत अनेकदा घडले आहेत त्यामुळे न्यायालयाचे आदेश असूनही अशा अनधिकृत बँनरबाजीवर कारवाई करताना पालिका कर्मचाऱ्यांवर बंधने येतात. आपल्या पक्षाचे होर्डिंग काढून त्याजागी दुसऱ्या पक्षाने होर्डिंग लावले म्हणूनही कार्यकर्त्यांमध्ये भांडणे आणि मारामाऱ्या होतात. ज्याचा ताण विनाकारण पोलीस प्रशासनावर पडतो. सण-उत्सवांव्यतिरिक्त राजकीय पुढाऱ्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे वाढदिवस, विवाहसोहळे यानिमित्तानेही वर्षाचे बारा महिने बॅनरबाजी सुरूच असते. परिसरात कोणी मंत्री, राजकीय पुढारी, महनीय व्यक्ती येणार असेल तेव्हा प्रमख रस्त्यापासून समस्त परिसर होर्डिंग्स आणि बँनर्सने भरला होतो, हल्ली तर मुंज, ओटभरणी, गृहप्रवेश यांचेही बॅनर्स नाक्यांवर दिसू लागले आहेत. याशिवाय परिसरातील कोणी गौरवास्पद कामगिरी केली कि त्याचेही होर्डिंग्स परिसरात पाहायला मिळतात. हल्ली तर घरातील कुत्र्या-मांजरांच्या वाढदिवसाचेही होर्डिंग लावले जाऊ लागले आहेत.

सण आणि उत्सव यांच्या निमित्ताने रस्त्यांवर लावल्या जाणाऱ्या होर्डिंग्सवर अनेकदा देवतांची चित्रे छापली जातात. अशा होर्डिंग्स पुढे अनेक दिवस धूळ खात उभ्या असतात. ज्या देवतेची प्रतीकात्मक मूर्ती, चित्र आपण घरी आणून प्रतिदिन तिची पूजा करतो, तिची आराधना करतो, देवघरात तिला मनोभावे धूप उदबत्ती आणि मिष्टानांचा नैवेद्य दाखवतो अशा देवतेचे चित्र रस्त्यावर ऊन, वारा आणि धूळ खात असलेले पाहिल्यावर आपल्याला वाईट कसे वाटत नाही ? ज्या देवतेच्या नावाने होर्डिंग लावतो त्याच देवतेचा आपण अवमान करत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? पालिका प्रशासन हे फलक फाडून काढतात, नंतर ते कुठे फेकले जातात याचा आपल्यालाही थांगपत्ता लागत नाही देवतेच्या या अवमानाला आपणच कारणीभूत नाही का ? रस्त्यावर अनधिकृतने लावण्यात येणाऱ्या होर्डिंग्स रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांच्या अंगावर पडून दुखापत झाल्याच्या घटनाही अनेकदा घडतात, गाड्यांवर पडून गाड्यांचे नुकसान होते. अनधिकृत होर्डिंग्स आणि बॅनर्सवर पालिका प्रशासन काहीवेळा दंडात्मक कारवाई करते. राजकीय मंडळींना पैशांची काहीच कमी नसल्याने दंड भरून पुन्हा होर्डिंगबाजी सुरूच असते. कार्यक्रमांची माहिती देणारे फलक अवश्य लावावेत मात्र पालिका प्रशासनाकडून त्याची रीतसर परवानगी घेतली जाणे आवश्यक आहे. उत्सव संपल्यावर ते तात्काळ काढलेही गेले पाहिजेत.

२२ जानेवारीला श्रीरामजन्मभूमी अयोध्येत ऐतिहासिक सोहळा संपन्न होत आहे. या सोहळ्याची सिद्धता केवळ अयोध्येत नव्हे तर देशभर सुरु आहे. जात-पात, संघटना, संप्रदाय सारे भेद विसरून आज प्रत्येक रामभक्त श्रीरामाच्या आगमनाच्या तयारीला लागला आहे. प्रत्यक्ष श्रीरामजन्मभूमीत जाता आले नाही तरी राहत्या घरातून आणि मंदिरांतून श्री रामाचे पूजन करून आणि दिवाळी साजरी करून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. श्रीरामभक्तांसाठी हा दैवी सोहळा असला तरी आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांना बँनरबाजी करण्यासाठी ही पर्वणी आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत रामभक्तांना शुभेच्छा देणारे बॅनर्स आणि होर्डिंग्स रस्त्या-रस्त्यांतून आणि नाक्या-नाक्यावर दिसू लागतील. या शुभेच्छांमुळे रामभक्तांच्या उत्साहात कोणताही विशेष फरक पडणार नाही किंवा या शुभेच्छांची रामभक्तांना आवश्यकताही नाही. या होर्डिंग्सवर श्रीरामाची चित्रे छापली जातील. श्रीराम मंदिर उदघाटनानंतरही पुढील काही दिवस हे होर्डिंग्स रस्त्यावर असेच धूळ खात उभे असतील. ज्या श्रीरामाच्या स्वागताची आज आपण समर्पित भावाने आणि श्रद्धेने तयारी करत आहोत त्या श्रीरामाचे चित्र रस्त्यावर धूळ खात पडलेले आपल्याला पाहावेल का याचाही रामभक्तांनी विचार करावा.

# जागृत व्हाना देवीदेवता!करा काही कल्याण आता।।

आधुनिक केसरी

**अनेक देवीदेवतांनी जन्म घेतलेल्या या भारत देशाची आजची वास्तविक अवस्था पाहिली असता भक्तीच्या ओघात विवेक शून्य झालेला समाज संतांनी देवीदेवतांचा सांगितलेला आदर्श विसरून धार्मिकतेच्या नावावर मांडलेले थोतांड पाहून आज राष्ट्रसंतांनी काही वर्षांपूर्वी आपल्या भजनातुन देवांना केलेली प्रार्थना आज पुन्हा करण्याची गरज आहे. देवाधिकांचा जन्माचामुळ उद्देश न जाणता त्यांचे चरित्र न अभ्यासता त्यांचे कार्य विचार याला न अंगीकरता आंधळ्या भक्तीतीत आणी धार्मिकतेमध्ये हा देश बुडत चालला आहे.अनेक लोक या मार्गीलागून दुबळे होत चालले आहे.कर्म करून अमर झालेले आमचे आदर्श प्रभूराम श्रीकृष्ण वीर हुनुमान सर्व देवदेविता आज त्यांचीच आराधना करून लोकभक्तीच्या नांदात कर्म न करता काही कार्य न करता एकही विचार न अंगीकारता दैवावर विसंबून राहत आहेत.थोडक्यात आपल्या भजनात राष्ट्रसंत सांगतात समाज दुर्बल होत चालले आहे.**

**भक्तिमुक्तिचे सोंग वाढले, दुर्बलता करि आली ।**
**तत्वज्ञान हे विसरुनि गेले, रुढिस मान मिळाला।**

जिकडे तिकडे पंथ-मतांतर, गोंधळ हा घरि आला। सुळसुळाट हा साधुजनांचा, पोट भराया झाला कोणी सांगि न कोणा, भ्याडपणा उरि आला। सत्य भक्तिचे विसरुनि पथ हे, पोकळ भाव निघाला। देवावरती वाहि फुले परि, पाणि न दे गरिबाला।। भक्तीच्या सोंगात अडकलेला समाज पाहून त्यांच्या पासून फायदा घेण्यासाठी काही लोकांनी देवाधर्माचा बाजार केला आहे. देवाला रस्त्यावर आणले आहे.अलीकडे हा प्रकार जास्त दिसत आहे. या देशाचे आदर्श असलेले हे सर्व देवीदेवता देशाची अस्मिता असलेले प्रभू श्री राम बळाची देवता असलेले ब्रह्मचारी श्री वीर हुनुमान यांचे नावे शोभायात्रा काढून त्यानाचं त्यामध्ये शोभेची आणी मनोरंजनाची वस्तू केलेले आज आपल्याला दिसते.परंतु यांचा आदर्श खूप मोठा आणी महान विचार आहे. त्याचा विचार करून या देशात प्रत्येक नागरिका मध्ये ते रुजविणे आज गरजेचे आहे. आज देवीदवतांनी मानव जन्म घेवून जे केलेल कार्य आहे ते आज आपल्या करणं गरजेचं आहे. या देशाचे आदर्श अस्मिता असलेल्या श्रीराम कृष्ण वीर हुनुमान सर्व देवीदेवतांनी आपल्या विचारांतून कार्यातून घालून दिलेले आदर्श पूर्ण करायचे ते त्यांना अभ्यासून वाचून पूर्ण होतील नाचून नाही.प्रभू श्रीरामाचे भक्त उपासक आपल्याला व्हायचे असेल तर त्यांनी आपल्या जीवनात अंगीकारलेले मर्यादचे ममतेचे त्यांनी मिटवलेल्या जातीभेदाचे शूरत्वाचे तत्व विचार आपल्याला जाणावे लागतील ते अंगिकारावे लागतील.तेव्हाच आपण त्यांचे उपासक म्हणून शोभणीय होवू. वीर श्री हनुमंतरायचे उपासक व्हायचे असेल तर त्यांच्या सारख ब्रह्मचारी जीवन जगून पाहावं लागेल.त्यांनी त्यांच्या स्वामींची तनमनधनाने जी सेवाकेली तशीच आपल्या आपल्या जे कोणी आदर्श असतील त्यांची करावी लागेल तेव्हाच आपण त्यांचे खरे उपासक होऊ.थोडक्यात त्यांचे कार्य विचार जाणून तसे वागणे म्हणजे त्यांचे भक्त उपासक होणे आहे.

**सांगतो देव का ऐसा ? मंदिरीच रहावे तुम्ही।**
**परराष्ट्र चढे छातीशी, तरि लागु नका कुणि कामी।**
**होउ द्या नाश देहाचा । होऊ द्या नाश देशाचा**
**हा शब्द नसे देवाचा।**

परंतु आज लोक देवाधर्माचे कार्य विसरून सोंग घेवून ढोंग करण्यात धन्यता मानतात.भक्ती आणी उपासनेच्या ओघात देवाचे बाजारीकरण करणं या बाजारू भक्तांनी केले. या संपूर्ण भारतवर्षांचा असलेल्या आदर्श असलेल्या देवीदेवतांची आपल्या अधिकारने ते फायद्या घेत आहेत.त्यांच्या विचारणा तडा देवून ते या देवीदेवतांचा अपमान करणे चालू आहे.अधर्म वाढीस लागला आहे.लोक देवाधर्माची व्याख्या विसरले.अनीती नीतीवर राज्य करत आहे. देशाची दैनीअवस्था होवून देश वैचारिक पातळीत खीळखीळ झाला आहे.याचा फायदा दृष्ट घेतील सामान्य जनतेला लुटतील.या राष्ट्राला हानी पोहचवतील या दृष्ट लोकांना रोखण्यासाठी भोळ्याभाबळ्या लोकांना सावरण्यासाठी आपल्या ज्यांनी देवाचे दर्शन घडवून ज्यानी आपल्याला देव सांगितला दाखविला त्या संतांचा उपदेश घेवून आपल्या विवेक बुद्धीने देवाची भक्ती करणे गरजचे आहे.तुकडोजी महाराजांनी केलेली प्रार्थना पुन्हा करावी लागेलं

**सर्व जीवांना दे सद्बुद्धी, माणुसकीची कर्मकथा।**
**तुकड्यादास म्हणे सर्वांना, जाऊ दे कर्तव्य-पथा।।**

खोट्या भक्तीच्या धार्मिकतेच्या सोंगात फसलेले जे असतील त्यांना भक्ती देव धर्म याचे सत्यज्ञान होवून बाहेर पडोत. सर्वांना जीवाचे ज्ञान होवून कर्तव्य पथा पर्यंत पाहचो ही देवीदेवतांच्या चरणीं प्रार्थना

महेंद्रा सावके (हिरंगी)
९६०४६८०६८३

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# पाणी अडवा- पाणी जिरवा अंतर्गत बिलोणी येथे नाला खोलीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुका सततचा दुष्काळी तालुका आहे. या वर्षी खूप कमी पाऊस झाला त्यामुळे बळीराजाचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले , याचे भान ठेवत येथील सामाजिक बांधिलकी जपणारी निर्मला इन्स्टिट्यूट या संस्थेने बुधवार( ता,१० ) रोजी तालुक्यातील बिलोणी येथील कल्पना लक्ष्मण कदम या शेतकऱ्यांच्या सहाय्याने त्यांच्या शेता जवळील ओढ्यात जेसीबीच्या सहाय्याने मोठा बांध टाकून पावसाचे पाणी अडवण्याचा व ते साठवून तसेच ते जमिनीत जिरवण्याचा शेतकरी वर्गाला उपयुक्त असा उपक्रम सुरू केला,या नाला खोलीकरण चे उदघाटन सामाजिक कार्यकर्ते ,व निर्मला इन्स्टिट्यूट चे मार्गदर्शक तथा जलदुत धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते श्रीफळ फोडून विधिवत पूजा करुन बुधवार ता,१० रोजी दुपारी झाला,या प्रसंगी राजपूत यांनी उपस्थित गावकरी व शेतकरी वर्गाला "पाणी अडवा-पाणी जिरवा"यासाठी नालाखोलीकरण चे महत्व विषद केले व आणखी शेतकरी वर्गाने निर्मला इन्स्टिट्यूट च्या सहाय्याने नाला खोलीकरण करून पाणी साठवावे तसेच त्यांचा योग्य उपयोग पिकांना करावा असे आवाहन केले मार्गदर्शक राजपूत यांनी केले,,या प्रसंगी निर्मला इन्स्टिट्यूट च्या प्रमुख नॅन्सी रोद्रीग्ज, तसेच सामाजिक कार्यकर्त्या छाया बंगाळ,अमोल जगताप, व कदम परिवारातील मंडळी व भायगाव तथा बिलोणीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते, सदरील काम तीन दिवस चालणारे आहे.

# जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य कोषाध्यक्षपदी संजीवनीताई बाजड

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** मराठा सेवा संघ प्रणित महिलांचे वैचारिक



व लढाऊ संघटन असलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य कोषाध्यक्षपदी शिवमती संजीवनीताई बाजड यांची निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या राज्यस्तरीय बैठकीत प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके यांनी बाजड यांची नियुक्ती केली आहे.

राज्य उपाध्यक्षपदी निवड झालेल्या संजीवनीताई बाजड बीए.बीपीएड असून सुरुवातीच्या काळात त्यांनी रिसोड तालुक्यातील एका खाजगी शाळेवर मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले आहे. मात्र जिजाऊ ब्रिगेडचे महीलांसाठीचे कार्य पाहून त्यांनी आपले संपुर्ण जीवन जिजाऊ ब्रिगेडसाठी समर्पित करण्याचा निश्चय केला. आणि एक सदस्य म्हणून काम सुरु केले. महिलांसाठी झटणाऱ्या या रणरागिणीचे कार्यकर्तृत्व पाहून अल्पावधीतच त्यांना वाशिम जिल्हा अध्यक्षपदी बढती देण्यात आली.सलग सहा वर्ष जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडल्या नंतर त्यांनी विभागीय अध्यक्ष म्हणून चार वर्ष पदभार सांभाळला आहे. विभागीय अध्यक्ष असताना आपल्या कारकर्दीतील संपुर्ण महाराष्ट्रात सर्वात जास्त संवाद बैठका घेण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या कामातील ही घौडदौड पाहून त्यांची नुकतीच राज्य कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली असल्याचे जिजाऊ ब्रिगेडने जारी केलेल्या प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.




# मैत्रीची वीण घट्ट करणाऱ्या 'मुसाफिरा'चे पोस्टर प्रदर्शित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आयुष्याच्या प्रत्येक वळणावर मैत्री महत्वाची असते, हे अधोरेखित करणारा 'मुसाफिरा' चित्रपट येत्या २ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे. तत्पूर्वी या चित्रपटाचे आणखी एक नवीन पोस्टर सोशल मीडियावर झळकले आहे. या पोस्टरमध्ये हे चारही 'मुसाफिरा' एकत्र दिसत असून या चौघांची ओळख या पोस्टरमधून होत आहे. आनंद पंडित मोशन पिक्चर्स यांच्या सहकार्याने, नितीन वैद्य प्रॉडक्शन आणि गुझबम्प्स एंटरटेनमेंट प्रस्तुत 'मुसाफिरा' या चित्रपटाचे पुष्कर जोग दिग्दर्शक आहेत. 'मुसाफिरा'च्या घोषणेपासून या चित्रपटाची सर्वत्र चर्चा होती. आता या नवीन पोस्टरमुळे प्रेक्षकांची या चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढणार आहे. 'मुसाफिरा'मध्ये पुष्कर जोग हॅप्पी आणि हॅपेनिंग 'निशांत'ची भूमिका साकारणार असून पूजा सावंत सुपरस्टार 'मेघा'च्या भूमिकेत दिसणार आहे. स्वभावाने भोळा असणाऱ्या 'अमेय'च्या भूमिकेत पुष्कराज चिरपुटकर आहे. तर दिशा परदेशी ग्रुपला जोडून ठेवणारी प्रचंड एनर्जेटिक आणि तितकीच क्युट असलेली 'मिथिला' साकारणार असून ग्रुपमधील नाजूक प्रकरण आणि प्रचंड हळव्या 'क्रेया'च्या भूमिकेत स्मृती सिन्हा आहे. या चौघांच्या या भन्नाट पोस्टरममधून त्यांचे बॉंडिंग दिसत आहे. आता ही मैत्री कोणत्या वळणावर जाणार, हे चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच कळेल.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक पुष्कर जोग म्हणतात, " हा चित्रपट प्रेक्षकांना नॉस्टेल्जिक बनवेल. चार वेगवेगळ्या पार्श्वभूमी असणाऱ्या मित्रांची ही गोष्ट आहे. यात प्रेम आहे, मैत्री आहे, दुरावाही आहे. त्यामुळे हे रियुनियन त्यांना पुन्हा एकदा एकत्र आणणार का, त्यांचा सगळ्यांचा प्रवास वेगळ्या मार्गाने होणार, याचे उत्तर 'मुसाफिरा'मधून मिळणार आहे. हा चित्रपट तुम्हालाही तुमच्या मैत्रीची आठवण करून देईल."

# दिव्यांगांचा निधी ग्रामपंचायतींनी वाटप करावा

## सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंटची मागणी, अन्यथा आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून पाच टक्के निधी वाटप झाला नाही, याबाबत सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंट या संघटनेच्या वतीने किनवट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिव्यांगांच्या विविध समस्यांबाबत नुकतेच निवेदन देण्यात आले.

निवेदनात दिव्यांग बांधवांच्या समस्यांचे निराकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या पाच टक्के निधी हा दिव्यांग बांधवांना वाटप करण्यात येतो; परंतु, काही ग्रामपंचायतींकडून पाच टक्के निधी वाटप झाला नाही, तर काही ठिकाणी ग्रामसेवकांकडे वार्षिक उत्पन्नाची विचारणा केली असता, समाधानकारक माहिती मिळाली नाही, तसेच वार्षिक उत्पन्नाच्या कोणता कागदोपत्री लेखाजोखा दाखविण्यात आला नाही. ज्या ग्रामसेवकांनी निधी खर्च केला नाही अशा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी. जर ३० दिवसांच्या आत प्रत्येक ग्रामपंचायतींनी पाच टक्के निधी खर्च केला नाही, तर सेक्युलर दिव्यांग मुव्हमेंट या संघटने कडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, तसेच शासनाच्या घरकुल योजनेत दिव्यांग बांधवांना समाविष्ट करण्यात यावे व दिव्यांगांसाठीच्या विविध योजनांचे फलक ग्रामपंचायतीत दर्शनी भागात लावण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही ग्रामपंचायतचे




उत्पन्न लाखामध्ये असूनसुद्धा ग्रामसेवकांकडून ग्रामपंचायतीचे उत्पन्न तोंडी कमी सांगण्यात येत आहे. त्यामुळे दिव्यांगांना त्यांच्या हक्काचा निधी प्राप्त होत नाहीय. बंद लिफाफ्यात तीनशे, पाचशे ते हजार रुपयांपर्यंत वाटप करून दिव्यांगांची चेष्टा करण्यात येत आहे.



# जनसेवेसोबतच संविधान प्रचाराचे अनमोल कार्य करणारे : अमोल साबळे

आधुनिक केसरी

**आयुष्यात मला चळवळीने खूप काही शिकविले.ही रस्त्यावरची चळवळ.अन ही चळवळ गतिमान करण्यासाठी दैनिक सम्राटने अधिक प्रेरणा दिली.दैनिक सम्राट मधील वाचनात आलेले लेख वाचत राहिलो आणि त्यातून चळवळ काय असते हे समजू लागले.होय मी दै.सम्राट आणि चळवळीमुळेच घडलो..! असं नेहमी म्हणणारे अमोल साबळे यांच्या निस्वार्थी आणि प्रामाणिक कार्याबद्दल जनतेला सर्वकाही ज्ञात आहे. लोकांच्यात मिसळणारे अन चळवळीतून तयार झालेले एक विश्वासपुर्वक असे नेतृत्व म्हणून अमोल साबळे यांच्या नेतृत्वाकडे पाहिले जाते. अमोल साबळे हे पुरंदर तालुक्यातील निरा-शिवतक्रार येथील रहिवाशी असून त्यांनी त्यांच्या कार्यातून पुरंदर तालुक्यातुनच नव्हे तर जनतेत आणि आंबेडकरी चळवळीत एक वेगळे वलय निर्माण केलेले आहे.भीम सामाजिक विकास प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष म्हणून अमोल साबळे हे विविध सामाजिक उपक्रम हाती घेत असतात.त्यांच्या अनोख्या उपक्रमाची नेहमीच चर्चा होत असते.अमोल साबळे हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांचे एकनिष्ठ असलेले कार्यकर्ते होत.**

अमोल साबळे ही व्यक्ती स्वतःचा वाढदिवस साजरा करण्यापेक्षा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी विशेष महत्व देत असते.
दीपकभाऊ निकाळजे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ते विविध उपक्रम हाती घेत असतात.
राष्ट्रीय नेत्याप्रति एकनिष्ठा जपत जनसेवेच्या बांधिलकीला प्रामाणिकपणे निभावत असतात.
विविध सामाजिक प्रश्नांना हात घालत ते तडीस नेहण्याचा प्रयत्न करत असतात.त्यामुळे अमोल साबळे यांच्या कार्यावर लोकांचा पूर्णपणे विश्वास निर्माण झालेला आहे.अमोल साबळे हे नांव घेताच क्षणी हो आम्ही त्यांना ओळखतो अशी साहजिकच अनेकांच्या ओठांवर प्रतिक्रिया उमटत असते.
लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणारे अमोल साबळे म्हणजे सर्वसामान्य माणसांना हा माणुस आपलासा वाटतो.म्हणून तर त्यांच्या समवेत विविध जाती धर्मातील लोकांचा गराडा पाहायला मिळतो.ही जपलेली माणसेच त्यांच्या कार्याचे नेहमी कौतुक करताना पाहायला मिळत असतात.हे खरं आहे की अमोल साबळे यांनी सर्व जाती धर्मातील लोकं आपलीसी केलेली आहेत.आपल्या सोबत अमोल साबळे आहेत ना? आता अजिबात टेन्शन घ्यायचे कारण नाही.जिथे अमोल साबळे आहेत. तिथला विषय संपला.अशी भावना लोकांमध्ये आपोआप निर्माण होत असते.अमोल साबळे यांच्या कार्यपद्धती बद्दल प्रचंड आत्मविश्वास लोकांना वाटत असतो.गावचा विकास व विविध समस्यांपासून ते महाराष्ट्र राज्यात कुठेही अन्याय अत्याचार घडो ते शासन दरबारी ह्या व्यथा मांडत असतात.आवाज उठविण्याचा प्रयत्न करत असतात.त्यांच्या आचरणातून नेहमी संविधानाची भाषा दिसून येत असते.संविधान ही समस्या सोडविणारी एक न्यायिक भाषा असून संविधानाच्या आधारेच अमोल साबळे समस्यांची मांडणी करत असतात.विविध समस्यांची निवेदने ते देत असतात. प्रश्न सुटेल याच आशेने लोकं सुद्धा स्वतःचे दुःख व अडचणी त्यांच्या समोर घेऊन येत असतात.त्या सोडविण्यासाठी अमोल साबळे यांची सकारात्मकता आणि तळमळ दिसून येते. जनसेवेसाठी तत्पर तयार असणारे लोकमान्य नेतृत्व म्हणून त्यांना पसंती मिळत असते.आज ह्याच नेतृत्वाची दखल जनताच नव्हे तर राजकीय नेते मंडळी सुद्धा घेत असतात.अमोल साबळे यांच्या कार्यपध्दतीचा एक वेगळाच दबदबा व शासन,प्रशासन दरबारी प्रभावीपणे समस्या मांडणारा ठसा उमटलेला आहे. दखल सुद्धा अधिकारी वर्गाकडून घेतली जात असते.रोखठोक आणि परखडपणे स्वतःची भूमिका जनमाणसांत घेऊन जाणारे अमोल साबळे नेहमीच



गोर गरीब जनतेच्या पाठिशी अगदी खंबीरपणे उभे राहत असतात.हा आपला माणूस आहे.अशी भावना लोकांच्या मनात तर आहेच शिवाय यातून एक आपुलकीचे नाते निर्माण झालेले आहे.
जनसेवेसोबतच संविधान कार्याची सुद्धा बांधिलकी जपत आलेले आहेत.लोकांमध्ये संविधानाची जागृती घडावी.संविधान समजावे म्हणून भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत ते लोकांना देत असतात.जेव्हा नेते मंडळी असोत किंवा विविध क्षेत्रातील लोकं निरेच्या परिसरात येत असतात तेव्हा सुद्धा भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत देऊन त्यांचा सत्कार करत असतात.भारतीय संविधानाच्या उद्देशिका प्रत ५ हजाराहून अधिक वाटप केलेल्या आहेत.गेली अनेक वर्षांपासून कुणाचा वाढदिवस असो किंवा कुणाची कोणत्या पदावर निवड झालेली असो ते त्या प्रत्येक व्यक्तीला भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत देत सन्मानित करत असतात.त्याच सोबत ते प्रबोधनाच्या दृष्टीने पुस्तके सुध्दा देत असतात. संत कबीर,धम्मपद,शिवाजी कोण होता? महाडचा मुक्तीसंग्राम आदीं सारखी दोन हजारांहून अधिक पुस्तके त्यांनी वाटप केलेली आहेत.चळवळीतून काम करत असताना रस्त्यावरची लढाई लढण्यास ही ते कधी कमी पडलेले नाहीत.न्याय मिळविण्यासाठी रस्त्यावरचे आंदोलन करताना अनेकदा अडचणी आल्या.परंतू ते कधीच डगमगले नाहीत.विविध जाती धर्मातील अनेक आंदोलनांना ते पाठींबा देत असतात.ते स्वतःची सुद्धा भूमिका मांडत असतात.लोकांसाठी आजही ते कोर्टाच्या पायऱ्या चढत आहेत.ज्युबिलंट कंपनीच्या विरोधात ते भूमिका मांडत आहेत.येथील प्लँट हा धोकादायक असून तो बंद करण्यात यावा.
म्हणून ते न्यायालयीन लढा लढत आहेत.शैक्षणिक कार्यात सुद्धा ते नेहमी सहभाग घेत असतात.
शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून अमोल साबळे यांनी शाळेच्या हिताच्या दृष्टीने अनेक सकारात्मक निर्णय घेतले.विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांना प्रोत्साहित करत असतात.अडल्या नडल्या गोर गरिब जनतेला संकटकाळी सुद्धा रात्रीची वेळ न पाहता मदत करण्यासाठी धावून येत असतात.सर्वांनाच मदत करण्याची भावना त्यांच्या सामाजिक बांधलकीतून पाहायला मिळत असल्याने आज अमोल साबळे यांनी त्यांच्या कार्यामुळे लोकांच्या हृदयात स्थान मिळविलेले आहे.जनसेवेसोबतच संविधान प्रचार आणि प्रसाराचे कार्यच नव्हे तर त्यांच्या कडे आलेल्या प्रत्येक समस्येवर ते सकारत्मकपणे काम करत असतात.या पुढे ही हे कार्य असेच करत राहणार असल्याचा विश्वास सुद्धा अमोल साबळे व्यक्त करत असतात.



सुशील गायकवाड
9309474068



# चौघा ज्येष्ठांकडून काश्मीर ते कन्याकुमारी सायकल यात्रा यशस्वी

## ३२ दिवसांत ३८०० किलोमीटरचा प्रवास केला पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भारताच्या उत्तर टोकाकडून दक्षिण टोकाकडे कोणत्याही बाह्य साहाय्याविना चौघा ज्येष्ठांनी सायकलवारी करीत 'ज्ञान की ज्योत'मधून तंदुरुस्त भारत, नवीन शिक्षण धोरण याबाबत जागृती केली. काश्मीर ते कन्याकुमारी असा ३८०० किलोमीटरचा सायकल प्रवास या चार ज्येष्ठांनी अवघ्या ३२ दिवसांत पूर्ण केला. त्यांच्या या यशस्वी मोहिमेबद्दल पुण्यातील विविध संस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या अनुभव कथनाने उपस्थित भारावून गेले. पुण्यातील संजय कट्टी (६५ वर्ष) आणि मोनिष चक्रवर्ती (५२ वर्ष), तर डेहराडूनचे अनुभवी जोडपे विश्व धीमान (वय ७० वर्षे) आणि कमलजीत सिंग (वय ७४ वर्षे) यांनी हा महत्त्वाकांक्षी आणि आव्हानात्मक स्वयं-समर्थित (कोणतेही बॅकअप वाहन नाही) अशी ही सायकलिंग मोहीम श्रीनगर (काश्मीर) ते कन्याकुमारी (तामिळनाडू) यशस्वीपणे पूर्ण केली. हाबिन्सन पर्सनॅलिटी अँड आंत्रप्रेन्युअर स्कुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे रिसर्च पार्क फाउंडेशन, पुणे विद्यार्थी गृह, अस्पायर स्किल्स आणि यंग सिनियर्स या संस्थांच्या वतीने पुण्यातील सायकलस्वार संजय कट्टी, मोनिष चक्रवर्ती यांचा सत्कार करण्यात आला. पुणे विद्यार्थी गृहाच्या महाराष्ट्र विद्यालयात झालेल्या कार्यक्रमावेळी पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, संचालक सुनील रेडेकर, हाबिन्सनचे संस्थापक अदनान सिद्दीकी, यंग सिनिअर्सचे भुवनेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.यंग सिनीयर्स ग्रुपच्या गौरी पटवर्धन यांनी संजय कट्टी आणि मोनिष चक्रवर्ती यांची ओळख करून दिली व त्यांच्या विविध सायकल आणि गिर्यारोहण मोहिमांची माहिती दिली. पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी अफान शेख आणि आदित्य पाटील यांनी कट्टी व चक्रवर्ती यांची मुलाखत घेत सायकल सफरी, गिर्यारोहण, त्यासाठी लागणाऱ्या मानसिक आणि शारिरीक तयारीबद्दल जाणून घेतले. कार्यक्रमासाठी यंग सिनीयर्सचे लोकेश मराठे व डॉ. अपर्णा कुलकर्णी यांनी विशेष सहकार्य केले. यंग सिनीयर्सचे दत्तात्रेय गोखले, सुप्रिया चक्रवर्ती, यतीन जोशी, गौतम भिंगानिया, हेमा राव उपस्थित होते. इलेक्ट्रोमेडिक्सचे ठाकूरदेसाई व स्वानंद यात्राचे सौरभ कुलकर्णी उपस्थित होते. यंग सिनियर सायकलिस्ट ग्रुपचे प्रीती म्हस्के यांनी संजय कट्टी यांचे, तर प्रा. दत्ता गोखले यांनी चक्रवर्ती यांचे कौतुक केले. संजय कट्टी म्हणाले, "या सायकलिंग मोहिमेची 'सक्षम बनो, तंदुरस्त रहो, हम फिट तो भारत फिट, जय हिंद' ही घोषणा होती. भारताच्या उत्तर ते दक्षिण सायकल मोहिमेची सुरुवात लाल चौक (श्रीनगर) येथून २७ नोव्हेंबरला झेंडा दाखवून झाली आणि १ जानेवारी २०२४ रोजी विवेकानंद स्मारक (कन्याकुमारी) येथे सूर्योदयास समारोप झाला. या ३२ दिवसांत ३८७० किलोमीटर सायकल चालवून १२ राज्ये पार केली आहेत. या प्रवासात अनेक ऐतिहासिक ठिकाणे आणि प्रमुख शहरे पार करताना अनेक चांगले अनुभव आले. ज्ञान मिळवा व इतरांना समृद्ध करा, तंदुरुस्त राहा व इतरांना प्रेरित करा, या संदेशाचा प्रचार करत आम्ही जम्मू-काश्मीर (श्रीनगर), पंजाब (अमृतसर, लुधियाना, अंबाला), हरियाणा (पानिपत), दिल्ली (नवी दिल्ली), उत्तर प्रदेश (आग्रा, मथुरा, झाशी), मध्य प्रदेश (सागर), महाराष्ट्र (नागपूर), तेलंगणा (हैदराबाद), आंध्र प्रदेश (अनंतपूर), कर्नाटक (बेंगळुरू), तामिळनाडू (सालेम, मदुराई आणि कन्याकुमारी) असा प्रवास केला.

# विजेच्या तारेचा धक्का लागल्याने एकाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील दत्तनगर परिसरात विजेच्या तारेचा धक्का लागून एका 42 वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली आसिफ युसुफ शेख (वय 42 रा बेलगाव रोड वैजापूर) असे मृत इसमाचे नाव आहे याबाबत अधिक माहिती अशी की आसिफ शेख हे दत्तनगर मध्ये सोमवारी सायंकाळी काम करत होते त्यावेळी विद्युत वाहक तारांशी अचानक त्यांचा संपर्क आल्याने त्यांना विजेचा जोरदार धक्का बसून ते खाली कोसळले त्यांना कामावरील सहकाऱ्यांनी तात्काळ वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यापासून त्यांना मृत घोषित केले याप्रकरणी वैजापूर पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास वैजापूर पोलीस करत आहे.

# रिपब्लिकन सेना परभणी जिल्हाध्यक्ष शरद चव्हाण यांची पुन्हा नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**
**जिंतुर :** सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेबांच्या आदेशाने प्रदेश अध्यक्ष मा.काकासाहेब खंबाळकर साहेबांच्या सुचनेनुसार परभणी पूर्व जिल्हाध्यक्ष पदी मा.राजकुमार सूर्यवंशी यांची तर परभणी पश्चिम जिल्हाध्यक्ष पदी शरद चव्हाण यांची परभणी जिल्ह्यासाठी पुन्हा नवनियुक्तती पत्र आज दि.06 जानेवारी 2024 रोजी आदरणिय सरसेनानी मा.आनंदराज आंबेडकर साहेबांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर येथे देण्यात आले आहे. या निवडीचे स्वागत भैय्यासाहेब भालेराव रिपब्लिकन सेना राज्य संघटक,मा.दिपक ठेंगे रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष मानवत, सुर्यकांत रायबोले रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष पालम, संजय भाग्यवंत, रिपब्लिकन सेना पाथरी, सुनिल वाकळे,सुभम गायकवाड, नितीन वाकळे, चंद्रमुनी लोखंडे, आदीने केले.



# जैन यांना समता उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील बोरी येथील कै.जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय जिंतूर चा समता उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिंतूर येथे सात जानेवारी रोजी जिल्हा ग्रंथालय संघाच्या वार्षिक अधिवेशनात माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते श्री जैन यांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रशांत पाटील, सिनेट सदस्य डॉ. रामेश्वर पवार, छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहा ग्रंथालय संचालक सुनील हुसे, अनिल बाविस्कर, भास्कर पिंपळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. नेमिनाथ जैन यांना याआधी ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाबद्दल नांदेड ,बोरी,महाड ,बेळगाव ,पुणे, म्हाडा, सातारा, भोकरदन व जळगाव येथील पुरस्कार मिळाले आहेत. जैन यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे मित्र परीवार व सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# देशाचे स्थान उंचावण्यासाठी विज्ञानाची कास धरावी : गटशिक्षणाधिकारी बन

## डॉ. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त विज्ञान प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या 121 व्या जयंतीनिमित्त जगदाळे महाविद्यालयामध्ये दि.8.रोजी विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन गट शिक्षणाधिकारी भारत बन व संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटन प्रसंगी मच्छिंद्र कवडे, प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे, डॉ.रविंद्र कठारे, डॉ. दयानंद कवडे, प्रा.विश्वास चौधरी, प्रा.अजित तिकटे आदींची उपस्थिती होती.

परीक्षकाच्या परीक्षणाद्वारे यशस्वी विद्यार्थी प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक जिजामाता विद्यामंदिर बार्शी येथील कु.प्रांजल देवेंद्र मोरे व कु.शुभ्रा महेश माने. व्दितीय क्रमांक बालसंस्कार विद्यालय वाशी अंशुमन सुनील आवारे तर तृतीय क्रमांक महात्मा फुले विद्यामंदिर बार्शी रुद्र नितीन शिंदे व मयुरेश मिलिंद विटकर. **पूर्व माध्यमिक गट :** प्रथम क्रमांक महाराष्ट्र विद्यालय बार्शी वेदांत संतोष गव्हाणे व शिवराज प्रशांत गाडेकर व्दितीय क्रमांक महाराष्ट्र विद्यालय बार्शी श्रेयश चारुदत्त जगताप तृतीय क्रमांक छत्रपती शिवाजी विद्यालय वाशी वेदांत अरुण देशमुख व राहील मेहराज काझी.

**माध्यमिक गट :** प्रथम क्रमांक किसान कामगार विद्यालय उपळाई करण सचिन थोंगे व राजवीर आणासाहेब बोटे व्दितीय क्रमांक लोकसेवा विद्यालय आगळगाव धनराज पाटील केशव विधाते तृतीय क्रमांक महाराष्ट्र विद्यालय बार्शी तन्वीर जमील तांबोळी व पियुष महादेव कोरे.

**उच्च माध्यमिक गट :** प्रथम क्रमांक श्री. शिवाजी महाविद्यालय बार्शी कु.श्रुती बोबडे व कु,नम्रता शीरामे व्दितीय क्रमांक कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी प्रणव देशमुख व पृथ्वीराज गायकवाड तृतीय क्रमांक कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी कु.पुजा कोठावळे व कु.दुर्गा देशमुख

**महाविद्यालयीन गट :** प्रथम क्रमांक कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी ओम उंद्रे व कु.प्रतिक्षा देशमुख व्दितीय क्रमांक कर्मवीर कृषी तंत्र विद्यालय बार्शी जाधव राजदीप रामहरी व जगताप हार्दिक तृतीय क्रमांक श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी कु.माने ऐश्वर्या सुभाष व भातलवंडे श्रुतिका

**शिक्षक गट :** प्रथम क्रमांक श्री.संग्राम दादासाहेब देशमुख व्दितीय क्रमांक कु.तांबे साधना लहू. वरील स्पर्धकांना श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार व सांस्कृतिक विभाग प्रमुख मा.जयकुमार शितोळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे, प्रा.डॉ रविंद्र कठारे,प्रा.शाम डोके,प्रा.विश्वास चौधरी,प्रा.अजित तिकटे परीक्षक मोहोळकर सर यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान प्रदर्शनाचे समन्वय प्रा.शाम डोके सूत्रसंचालन प्रा.सुनिता डोके व प्रा. सुनिल आवारे यांनी केले तर आभार प्रा.डॉ संजय माळी यांनी मानले. हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रा.विलास गरड, प्रा.राजाभाऊ बनसोडे,प्रा.केरबा जाधव, प्रा.राम जाधव, प्रा.जयंत कवडे प्रा. दैवशाला रसाळ यांनी परिश्रम घेतल. या प्रसंगी सर्व प्राध्यापक परीक्षक विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

## बाजार सावंगी परिसरात रुग्ण वाढले


आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद परिसरात ढगाळ वातावरणाचा प्रभाव जाणवत असून मंगळवार (ता:९) सकाळपासून ढग आच्छादित व आभाळाचे वातावरण आहे दुपारी बारानंतर थेंब थेंब पावसाने हजेरी देखील लावली नोव्हेंबर मध्ये झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले होते तर गहू हरभरा पेरणी होऊन उगवलेल्या व वाढीस लागलेल्या पिकांचे नुकसान पुन्हा होणार आहे उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे मका ज्वारी या दुबार पेरणीच्या पिकांचे अतोनात नुकसानीची शक्यता आहे. बदललेल्या वातावरणाचा सर्वसामान्यांच्या आरोग्यावर देखील दुष्परिणाम झालेला जाणवतो खोकला सर्दी यासारखे आजार जाणवत आहे अशा वातावरणाने साथीच्या आजारात वाढ होण्याची शक्यता आहे.

## माँ जिजाऊ जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राजमुद्रा



फाउंडेशन, गणपत दादा इंग्लिश स्कूल व जिजाऊ जन्मोत्सव सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा चार गटात घेतली जाणार असून गट-अ पहिली ते चौथी, गट-ब पाचवी ते सातवी, गट-क आठवी ते दहावी, आणि गट-ड अकरावी बारावी या चार गटात होणार आहे. स्पर्धेचा निकाल लगेच जाहीर केला जाणार आहे. यामध्ये स्पर्धकांना स्मृतिचिन्ह,सन्मानपत्र व रोख रक्कम बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. ही स्पर्धा 11 जानेवारी रोजी सकाळी नऊ ते दोन या वेळेत गणपत दादा इंग्लिश स्कूल राजूर या ठिकाणी होणार असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिजाऊ जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.



## मंगल अक्षदा वाटप कलशाचे पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या येथून आलेल्या मंगल अक्षदा वाटप कलश पूजन पालखी यात्रेची सोमवारी सकाळी आठ ते दहा या वेळात संपूर्ण गावातील रस्त्यावरून शोभा मिरवणूक काढण्यात आली. महिला पुरुष व बालकांचा समावेश होता. 22 जानेवारी राम मंदिर लोकार्पण सोहळा असल्याने आपापल्या घरी राहूनच प्रभू रामचंद्रांच्या लोकार्पण सोहळ्याचे साक्षीदार होऊन अक्षदा समर्पित व्हाव्या यासाठी मिरवणूक होती. ज्ञानेश्वर नलावडे प्रभाकर शिंदे अप्पाराव नलावडे कारभारी नलावडे विकास कापसे भिकन घुले बबन पुंड आजिनाथ धुमाळ सतीश खंडागळे दिलीप शिंदे कृष्णा नलावडे शुभम चव्हाण लहू नलावडे यांचे सह राम भक्त मंडळ बाबाजी भक्त परिवार नरेंद्र स्वामी भक्त परिवार बजरंग दल संत निरंकारी मंडळ सांप्रदायिक भजनी मंडळ आदींचा सहभाग होता.

## नायलॉन मांजानिर्मिती, पुरवठा करणे चुकीचे : स.पो.नि. अनमोल केदार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात पोलिस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण



यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलिस स्टेशनचे सपोनि अनमोल केदार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे कि, मकरसंक्रात सणांचे अनुषंगाने तरुणाई सध्या पंतग उडविण्याच्या मोहात धुंद होवुन पंतग उत्सव साजरा करत आहे. परंतु पंतग उडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तरुणाई ही नायलॉन / प्लास्टीक सिंथेटिक धाग्यापासून बनविलेल्या मांजा चा वापर करतात, वास्तवीक या मांज्याचे विघटन होत नसल्याने तसेच तो अत्यंत घातक असल्यामुळे रस्त्यावरून चालणारे नागरिक व दुचाकी धारक यांना नायलॉन मांजाचा फास ते गंभीररित्या जखमी झाले आहे.तसेच पतंगबाजी करण्यासाठी युवक हे उंच ईमारतीच्या छतावर किंवा इतर जिर्न अथवा घातक अशा अति उंच ठिकाणी जातात ज्यामुळे



पतंग उडवितांना त्यांचा तोल जावुन, अथवा इलेक्ट्रीक शॉक लागून त्यांचे सोबत दुर्देवी घटना घडतात. त्याचप्रमाणे पंतग उडवितांना हुल्लडबाजी करून नये अतिउत्साहाचे भरात मुले हे पळत मुख्य रस्त्यावरुन पंतग पकडयासाठी धावत पळतात ज्यामुळे अपघात होवुन मुले जखमी होत आहेत त्यामुळे अशा प्रकारचे वर्तन टाळणे अत्यावश्यक आहे. तसेच सोयगाव पोलीस ठाणे अतंर्गत एक विशेष पथक तयार करून त्यांचे द्वारे नायलॉन / प्लास्टीक धाग्यापासुन सिंथेटिक बनविलेल्या मांजाची जिल्हयात कोणीही निर्मीती अथवा पुरवठा तसेच याचा साठा करणारे दुकानदार अथवा व्यक्ती यांची गय न करता त्यांचे विरुध्द धडक व सक्त कायदेशिर कारवाई करण्यात येईल कलम १८८ भादंवी असिह कलम ०५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ प्रमाणे एक गुन्हा दाखल करण्यात अशा गंभीर इशारा सपोनि अनमोल केदार यांनी दिला आहे. याचप्रमाणे मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी गृहशाखा/ दंडवि-१/ कावि-१८ दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या आदेशान्वये जिल्हयात व तालुक्यात दिनांक ०२/१/२०२४ ते दिनांक १८/०१/२०२४ पर्यंत पंतग उडविण्यासाठी तयार करण्यात येणारा नायलॉन / प्लास्टीक सिंथेटिक धाग्यापासून बनविलेल्या मांजाची निर्मीती, विक्री, व वापर यावर बंदी घातली आहे. अशा प्रकारे कोणताही ईसम अथवा दुकानदार हा नायलॉन / प्लास्टीक सिंथेटिक धाग्यापासुन बनविलेल्या मांजाची चोरटी विक्री अथवा त्याचा साठा करित असेल तर त्यांची माहिती तात्काळ सोयगाव पोलीस नियंत्रण कक्षला संपर्क साधावा असे आवाहन सपोनि केदार यांनी केले आहे.

## पंतप्रधान मोदींकडून होणारे उद्घाटन रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** बहुप्रतिक्षित, बहुचर्चित वर्धा – यवतमाळ – नांदेड रेल्वे मार्गाचे लोकार्पण युवा दिनी म्हणजे १२ जानेवारीला करण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. मात्र हा सोहळा वर्धा की कळंब स्थानकावर घ्यायचा याचा वाद उद्‌भवला होता. खासदार रामदास तडस हे सोहळा वर्ध्यात घेण्याबाबत आग्रही होते. तर श्रेय घेण्यास उत्सुक काही यवतमाळकर नेते कळंबसाठी हट्ट धरून बसले होते. या वादात शेवटी हा सोहळा रद्द करण्याचा निर्णय नागपूर विभागीय रेल प्रशासनाने घेतला. खासदार तडस हे अन्य राज्यात असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळाली नाही. मात्र त्यांच्या कार्यालयाने सोहळा रद्द झाला असल्याचे मान्य केले. युवा दिनी १२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्ही.सी.द्वारे मार्ग खुला झाल्याचे जाहीर करणार होते. थेट पंतप्रधान कार्यालयातून या बाबत मध्य रेल्वे प्रशासनाला या विषयी विचारणा झाली. खासदार रामदास तडस यांच्या कार्यालयाने यास दुजोरा दिला. या दिवशी खासदार तसेच वर्धा व देवळी येथील तसेच यवतमाळचे आमदार उपस्थित राहू शकतात का, अशी चौकशी झाली. मात्र रेल्वे प्रशासन या दिवशी औपचारिक कार्यक्रम कळंब रेल्वे स्थानकावर तर खासदार वर्धा स्थानकावर कार्यक्रम घेण्याबाबत आग्रही आहे. हा वादाचा मुद्दा आहे. या मर्गाबाबत तडस यांनी सतत पाठपुरावा केला. प्रश्न मार्गी लावला. म्हणून वर्ध्यात सोहळा व्हावा, अशी भूमिका आहे. वाद निवळेल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या मार्गाचा पहिला टप्पा पूर्णत्वास गेला असून गाड्या डिसेंबर अखेरीस धावायला सुरुवात होईल, अशी शक्यता नागपूर विभागीय रेल्वेचे प्रबंधक आशुतोष श्रीवास्तव यांनी चार महिन्यांपूर्वी व्यक्त केली होती.

## म. बसवेश्वर, संत काशिबा गुरव युवा आर्थिक महामंडळाच्या कर्ज योजनेचा लाभ घ्यावा : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय + वित्त आणि विकास महामंडळाकडे जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ व संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ या दोन महामंडळाचे कामकाज सोपविण्यात आले असून या महामंडळांचे कामकाज सुरु झाले आहे. राज्यातील गुरव व लिंगायत समाजातील घटकांसाठी व्यापार, उद्योग, शेतीपुरक व्यवसाय तसेच व्यावसायिक व उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज योजना उपलब्ध आहेत.याचा लाभ घ्यावा असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.कर्ज योजनांची माहिती खालीलप्रमाणे-ऑनलाईन कर्ज योजना- राष्ट्रीयकृत, नागरी, सहकारी, शेड्युल्ड - मल्टिशेड्युल्ड बँकांकडून घेतलेल्या कर्जाच्या दरमहा नियमित परतफेड केलेल्या हप्त्यावरील



१२ टक्के पर्यंतच्या व्याजाच्या व ५ वर्षा पर्यंतच्या मुदत कर्जावरील व्याज रकमेचा परतावा लाभार्थ्यास ऑनलाईन पद्धतीने बचत खात्यात महामंडळातर्फे जमा करण्यात येईल. तथापि, लाभार्थ्यांनी बँकेकडे कर्जासाठी अर्ज करण्यापुर्वी महामंडळाचे पात्रता प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. ऑनलाईन कर्ज योजनांसाठी अर्ज महामंडळाच्या WWW.MSOBCFDC.ORG या वेबसाईटवर अर्ज करावा.असे पण सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सांगितले. १) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना- व्यापार उद्योग, सेवा व शेतीपुरक व्यवसायासाठी लागणारे कर्ज, कर्ज मर्यादा १० लाख रुपये पर्यंत, अर्जदाराचे वार्षिक कौतुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत. २) गटकर्ज व्याज परतावा योजना- बचत गट, भागीदारी संस्था (निबंधक मुंबई प्राधिकृत), सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक प्राधिकृत) इ. कर्ज मर्यादा १० ते ५० लक्ष रुपये, गटातील सभासदांची वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये मिळेल.याचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

# ऑनलाइन फ्रॉड करणारे आरोपी धुळे पोलिसांच्या ताब्यात

## बँक खात्यातून घातला होता लाखोंचा गंडा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** दहिवेल येथील अजय शिवाजी पाटील, यांना बनावट पॉलीस करून 9,99,300/- रूपयांची फसवणुक केली बाबत सायबर पो स्टेला दि. 15 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला होता.
सदर गुन्हाचा तपास सायबर पोलीस स्टेशन कडे सुरु असतांना तक्रारदार यांचे ज्या बँक खात्यात पैसे ट्रान्सफर झाले आहेत ते बैंक खाते गोठविण्यात आले आहेत. त्यानंतर तांत्रिक तपासानंतर आरोपींची माहिती काढण्यात आली.
तांत्रिक पुरव्यानुसार आरोपी हे ठाणे, कल्याण, मुलुंड येथे मुंबई अशा मोठ्या शहरातील असले बाबत माहिती मिळविण्यात आली. त्यानुसार सायबर पोलीस स्टेशन येथुन एक अधिकारी व कर्मचारी यांची तपास टिम तयार करुन त्यांना आरोपीतांचा शोध घेण्यास रवाना केले. तपास टिम यांनी तांत्रिक विश्लेषण नुसार आरोपीचा शोध घेवुन कल्याण येथील दाट वस्ती मधुन फिरून कल्याण येथील पिसवली गावातुन 1) विवेक विनोद सिंग 2) शिवम राजु जयस्वाल दोन्ही रा. पिसवली, कल्याण (प.) यांना 01/01/2024 रोजी ताब्यात घेवुन धुळे सायबर पोलीस स्टेशन येथे आणले त्यांना अधिक विचारपूस केल्यानंतर त्यांचे कडुन गुन्हयातील सुत्रधार प्रल्दाद गजानन वाठोडकर यांचा नावाचा उलगडा झाल्यानंतर तांत्रिक पुराव्या नुसार त्याची माहिती काढुन तो कल्याण येथुन नाशिक मागे शिडों येथे पळुन गेले बाबत माहिती मिळाली सदर माहितीनुसार नाशिक येथे तपास पथक रवाना केले. तपास पथक त्याचा नाशिक येथे तपास करीत असतांना त्यांना कळाले को, तो शिर्डी येथे पसार झाला आहे त्यानंतर तपास पथक शिडों येथे रात्रभर फिरुन तपास केले तेव्हा तो दि. 02/01/2024 रोजी पहाटे 04.00 वाजता शिर्डी येथे मिळून आला त्यास शिर्डी येथुन ताब्यात घेवुन धुळे येथे आणण्यात आले त्यानंतर गुन्हयातील त्याचा साथीदार अविनाश हनुमंत वांगडे यांचे बाबत विचारपूस केली असता तो ठाणे येथील वर्तक नगर भागातील चाळीत राहत असले बाबत माहिती मिळाली त्यानंतर त्यांने दिलेल्या पत्यानुसार व तांत्रिक विश्लेषणानुसार पुन्हा तपास पथक ठाणे येथे रवाना करण्यात आले त्यानंतर ठाणे येथुन पहाटे दि. 06/01/2024 रोजी अविनाश हनुमंत वांगडे येथुन व 5. सागर विजय माळी हा कल्याण येथून पळून गोळेगाव ता. जुन्नर जि. पुणे पसार झाले बाबत माहिती मिळाल्याने त्यास दि. 09/01/24 रोजी पहाटे तपास पथकाने ताब्यात घेवून धुळे येथे आणले अशा प्रकारे गुन्हयातील आता पावेतो ।) विवेक विनोद सिंग रा. पिसवली कल्याण 2. शिवम राजु जयस्वाल रा, पिसवली कल्याण 3. प्रल्दाद गजानन वाठोडकर उर्फ संतोष वामन भोसले रा, नांदिवली, कल्याण 4. अविनाश हनुमंत वांगडे रा. लोकमान्य नगर, ठाणे 5. सागर विजय माळी रा. गोळेगाव ता. जुन्नर जि.पुणे यांना सायबर पोलीस स्टेशन तपास पथक (पोलीस निरीक्षक, धनंजय पाटील, पो.उप. निरी. कोठुळे, संजय पाटील, भूषण खलाणेकर, अमोल पाटील, दिलीप वसावे, तुषार पोतदार, प्रसाद वाघ, विवेक बिलाडे, मनिषा वाघ यांनी शोध घेवुन त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर सर्व आरोपीतांची पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली असुन गुन्हयात आणखी सहभाग असणारे गुन्हगार यांचा शोध सुरु आहे.
सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक श्री किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय व्ही पाटील, पो.उप. निरी. कोटुळे, असई जगदिश खैरनार, भुषण खलाणेकर, राजेंद्र मोरे, पोना अमोल पाटील, दिलीप बसावे, तुषार पोतदार, प्रसाद वाघ, प्रितेश चौधरी, सुभाष वळवी, हेमंत बागले, चेतन सोनगीरे, विवेक बिलाडे, अमितेश पाटील, मनिषा वाघ, रेवती बिलाडे, प्रियंका देवरे, सोनाली श्रीखंडे, मृणाली भावसार या पथकाने केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

# पाणीटंचाई प्रश्नी आ. पाटील यांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** आमदार मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खंडाळा येथे खंडाळा तालुका टंचाई आढावा बैठक संपन्न झाली.तालुक्यातील पाणी प्रश्नी सविस्तर पणे संवाद साधण्यात आला. यावेळी गावा गावातील पाणी संदर्भात असलेल्या समस्या आमदार मकरंद पाटील यांच्या समोर मांडण्यासाठी तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.
गावा गावातील पाणी टंचाईवर कशा प्रकारे उपाययोजना करता येतील यासाठी प्रशासकीय अधिकारी म्हणून प्रांताधिकारी राजेंद्र जाधव,तहसीलदार अजित पाटील व इतर उपस्थित होते.यावेळी लोणंद शहरातील पाणी टंचाई संदर्भात लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात आणि उपनगराध्यक्ष रविंद्र क्षीरसागर यांनी व्यथा मांडली.आ.मकरंद पाटील यांनी तात्काळ 3 टँकर मंजूर केले, व विहिरीतील गाळ काढणे व आडवे बोर मारणे तसेच शहरातील बंधाऱ्यांमधील गाळ काढणे व बंधारे दुरुस्त करणे इत्यादी कामे मार्गी लावण्यात आली. असे नगराध्यक्षा सीमा खरात आणि उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर यांनी म्हटले.

# मुख्यमंत्र्यांच्या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहा : प्रा. मापारी

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** चिखली येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या होणाऱ्या जाहीर सभेला तालुक्यातील शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी व तालुकाप्रमुख भगवान सुलताने यांनी केले आहे.
यावेळी बोलताना प्रा. मापारी म्हणाले, मेहकर मतदारसंघाला न भूतो न भविष्यती असा कोट्यवधी रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. अतिवृष्टी, दुष्काळ व नापिकीमुळे खचलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी नुकसानभरपाई रकमेमध्ये दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टरचा समावेश करून भरीव निधीची तरतूद मुख्यमंत्र्यांनी केली आहे. जनतेमध्ये मिसळणारा, शेतकऱ्यांच्या बांधावर जाणारा मुख्यमंत्री म्हणून त्यांची ख्याती आहे. लवकरच देशांमध्ये लोकसभेच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. त्या अनुषंगाने विदर्भामध्ये मुख्यमंत्र्यांची जाहीर सभा सर्वप्रथम आपल्या जिल्ह्यातील चिखली येथे १३ जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता पार पडणार आहे. या सभेला शिवसेना सरपंच, शाखाप्रमुख, बाजार समितीचे संचालक, महिला आघाडी पदाधिकारी यांच्यासह शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी सुनील पाटील सुलताने,विजय सानप, गजानन मापारी, इम्रान खान पठाण, शिव पाटील तेजनकर, कारभारी सानप जग्गाराव आडे, संतोष आघाव, हेमराज लाहोटी, संजय आटोळे, विठ्ठल जाधव, युवराज सोनुने, गणेश डव्हळे, बळीराम बोबडे, अशोक वारे, भिका पिसे, पंजाबराव धांडे, तुकाराम दहातोंडे, प्रल्हाद सुलताने, विजय डोईफोडे, मोतीराम डव्हळे उपस्थित होते.



# डॉ. जगदीश पाटील यांना कार्यगौरव सन्मानपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** येथील भुसावळ शहर पत्रकार संस्थेतर्फे संस्थापक अध्यक्ष तथा सरकारी वकील ॲड. नितीन खरे यांच्या हस्ते डॉ. जगदीश पाटील यांना कार्यगौरव सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
भुसावळ शहर पत्रकार संस्थेतर्फे दरवर्षी पत्रकारितेसह इतर क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तीचा सन्मानपत्र देऊन गौरव केला जातो. यावर्षीचे कार्यगौरव सन्मानपत्र डॉ. जगदीश पाटील यांना प्रदान करण्यात आले. बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य, संत साहित्यात पीएच. डी., नेट परीक्षा उत्तीर्ण तसेच मुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांचे हस्ते शिक्षकदिनी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे देण्यात येणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त डॉ. जगदीश पाटील यांचा कार्यगौरव सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सन्मानपत्राचे शब्दांकन व वाचन माजी अध्यक्ष श्रीकांत जोशी यांनी केले. यात त्यांनी डॉ. जगदीश पाटील सर यांच्या सर्वांगीण कार्याचा आढावा घेतला. यावेळी भुसावळ उपविभागीय पोलीस अधिकारी कृष्णांत पिंगळे, भुसावळ नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश वाघमोडे, व्हाईस ऑफ मीडियाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश उज्जैनवाल व जिल्हाध्यक्ष मिलिंद टोके, ऊर्दू विंगचे राष्ट्रीय अध्यक्ष हारून नदवी तसेच भुसावळ शहर पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा सरकारी वकील ॲड. नितीन खरे, माजी अध्यक्ष श्रीकांत जोशी, विद्यमान अध्यक्ष प्रेम परदेशी, सचिव हबीब चव्हाण, प्रकल्प प्रमुख सुनील आरक यांच्यासह पत्रकारांची उपस्थिती होती.

# फुलंब्री खुलताबाद रोडवरील दुभाजक काढा

## नसता लोकशाही मार्गाने आंदोलन : भारतीय दलित पँथर

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शहरातील महात्मा फुले चौक पासून तर खुलताबाद रोडवरील देवगिरी सहकारी साखर कारखान्यापर्यंत झालेले रोडवरील अतिक्रमण व पार्किंगला लावलेल्या गाड्या व रोडच्या कडेला दोन्ही बाजूला दुभाजक टाकण्यात आले असून ते तात्काळ काढून टाका अशी मागणी फुलंब्री तालुका भारतीय दलित पँथर च्या वतीने सार्वजनिक बांधकामांचे उपविभागीय अभियंता, फुलंब्री तहसीलदार, फुलंब्री पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्रीनिवास धुळे यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. तसेच दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुलंब्री खुलताबाद रोडवरील अतिक्रमण हटवावे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला दुभाजक टाकण्यात आले आहे ते तात्काळ हटवावे. यांच्यावर तत्काळ कारवाई करावी. दुकानदाराने आपली दुकाने रोडवर थाटली आहेत व गाड्या धारकांनी पूर्ण रोडवर कब्जा करून पार्किंगची व्यवस्था केलेली आहे यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांना आपल्या जीवाशी खेळावे लागत आहे यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात घडत आहेत या सर्वांना जबाबदार त्या रोडवरील दुकानदार व पार्किंगला लावणारे गाडी मालक आहेत. यामुळे एक दिवस आड अपघात होत आहेत व निष्पाप जीवांचा बळी जात आहेत याकरिता फुलंब्री शहरातील महात्मा फुले चौक पासून साखर कारखान्यापर्यंत कुठेही दुभाजकामध्ये वळण रस्ता देऊ नये व फुलंब्री टी पॉइंट ते साखर कारखान्यापर्यंत संपूर्ण दुभाजक लावण्यात यावे यामुळे कोणीही मध्ये घुसणार नाही व अपघाताची संख्या कमी होईल, असे न झाल्यास भारतीय दलित पँथरच्या वतीने आपल्या कार्यासमोर तीव्र प्रकारचे आंदोलन छेडण्यात येईल दिलेल्या निवेदनावर भारतीय दलित पँथरचे फुलंब्री तालुका अध्यक्ष रंजीत वाहुळ, तालुका उपाध्यक्ष सय्यद जहिरूद्दीन चिश्ती, महिला तालुका अध्यक्षा लक्ष्मी पाचवणे,बाळु साळवे, राहुल दांडगे, काकासाहेब शिरसाट, बबन गायकवाड, राज गंगावणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भव्य राज्यस्तरीय नमो चषक क्रीडा, सांस्कृतिक महोत्सव कार्यालयाचे थाटात उद्‌घाटन

## तब्बल ५१ क्रीडा प्रकार : १२ ते २६ जानेवारी दरम्यान रंगणार विभागीय क्रीडा संकुलात महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** घे पंगा खेळाचा, कर दंगा विजयाचा हे ब्रीद घेऊन छत्रपती संभाजीनगर क्रीडा मंच, छत्रपती संभाजीनगर ऑलिंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "नमो चषक -२०२४" आयोजन १२ ते २६ जानेवारी दरम्यान सूतगिरणी चौक जवळील विभागीय क्रीडा संकुलात करण्यात आले असून खेळाडूंसाठी महोत्सव संपर्क कार्यालयाचे थाटात उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड म्हणाले की, गेल्या अनेक महिन्यांपासून आपल्या या शहरात मोठा क्रीडा व. सांस्कृतिक महोत्सव घ्यावा अशी मागणी खेळाडूंच्या वतीने करण्यात येत होती, त्यांच्या मागणीनुसार शहरातला हा सर्वात मोठा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव पहिल्यांदाच होत असल्याचे सांगत प्रत्येक खेळाडूंनी मोठ्या संख्येने यामध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले. आमदार प्रदीप जैस्वाल, भाजप शहराध्यक्ष शिरीष बोराळकर, तसेच उद्योजक राम भोगले, छत्रपती संभाजीनगर ऑलंम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे यांनी आपले मनोगत व्यक्त करत सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. क्रीडा मंचावर महापौर बापू घडामोडे, माजी उपमहापौर राजू शिंदे, डॉ.विजय पाथ्रीकर, हर्षवर्धन कराड, युवा मोर्चा शहर जिल्हा अध्यक्ष रामेश्वर भादवे, जालिंदर शेंडगे, राज वानखेडे, एस.पी.जवळकर, मनीषा मुंढे, आदींची याप्रसंगी उपस्थिती होती. योगासने, विशू, स्केटिंग, आदी खेळ प्रकार प्रातिनिधिक स्वरूपात कार्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी सादर करण्यात आले. यावेळी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या क्रीडा प्रशिक्षक, महोत्सव समन्वयक तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सत्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर क्रीडा मंच व छत्रपती संभाजीनगर ओलंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित नमो चषक क्रीडा महोत्सव ऑलिंपिक असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने व ५१ विविध खेळांच्या क्रीडा संघटनेच्या मान्यतेने व सहकार्याने पार पडणार आहे. महोत्सवात प्रामुख्याने खो-खो, बॅडमिंटन, अ‍ॅथलेटिक्स, बास्केटबॉल, फुटबॉल, सायकलिंग, पॅरा अ‍ॅथलेटिक्स, पॅरा स्विमिंग, जिम्नॅस्टिक, तायक्वांदो, टेबल टेनिस, बुद्धिबळ, ज्यूदो, योगासना, बॉडी बिल्डिंग, कराटे, कबड्डी, स्विमिंग, तलवारबाजी,



लॉन टेनिस, स्विमिंग, रायफल शूटिंग, बॉक्सिंग, हॉकी, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टिंग, कुस्ती, स्केटिंग, जम्प रोप, हँडबॉल, गोल्फ, डॉजबॉल, टेनिस बॉल क्रिकेट, किक-बॉक्सिंग, सॉफ्टबॉल, रस्सीखेच, वूशु, ड्रॉप रोल बॉल, तेनिकोईत, ट्रायथलॉन, बेसबॉल, रग्बी, मल्लखांब, रोप मल्लखांब, आर्चरी, कॅरम, शूटिंग वॉलीबॉल, थ्रो बॉल, गदा युद्ध, पॅरा योगा, मॅरॉथॉन आणि एरोबिक्स जिमनॅस्टिक या स्पर्धा घेण्यात येणार आहे.

# वासाळा मक्ताच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वनहक्क समितीच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यात रोहयो अंमलबजावणी यंत्रणा म्हणून पहिल्यांदाच प्राप्त झालेल्या वासाळा मक्ता ग्रामसभेच्या द्वारे फळबाग लागवड करून या गावच्या प्रत्येक कुटुंबाला आर्थिक प्राप्ती होत आहे. आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने या गावाने टाकलेले पाऊल हे अभिनंदनीय असून वनहक्क कायद्याची प्रभावी अमंलबजावणी करून शाश्वत उपजीविकेसाठी वासाळा मक्ता हे गाव जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात नावारूपास येईल असा विश्वास जि.प. माजी सदस्य व भाजपा जिल्हा संघटन महामंत्री संजय गजपुरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती समारोहाचे औचित्य साधत व्यक्त केला. सामुहिक वनहक्क समिती व ग्रामसभा, वासाळा मक्ताच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती नुकतीच साजरी करण्यात आली. सामुहिक वनहक्क समितीच्या माध्यमातून सुरु असलेल्या वृक्ष लागवड क्षेत्रात व निसर्गरम्य वातावरणात संपन्न झालेल्या या जयंती समारोहाचे उद्‌घाटन वासाळा मेंढा गट ग्रामपंचायतीचे सरपंच पांडुरंगजी गायकवाड यांनी केले, तर अध्यक्ष स्थानी जि.प. चंद्रपूर चे माजी सदस्य संजय गजपुरे हे होते. याप्रसंगी अक्षय सेवा संस्था मेंडकीचे, सुधाकरजी महाडोळे, पोलीस पाटील दिलीपजी राऊत, उपसरपंच संदीपजी



कन्नाके,ग्रामसभा महासंघाचे सचिव राजेशजी पारधी, सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भोजराजजी पेंदाम व सचिव रामप्रकाश राऊत, मिंडाळा चे माजी सरपंच सौ. रत्नमाला कसारे, ग्रा.प.सदस्य विलासजी बोधेले,विजयजी लेनगुरे,सौ. सुरेखा कुंभरे, मिंडाळा ग्रा.प.चे तंटामुक्ती अध्यक्ष कसारे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरवातीला लेझीम पथकाने समारंभ स्थळी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी सर्वच वक्त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर विचार व्यक्त केले. यावेळी गावातील काही विद्यार्थिनी व महिलांनी सुद्धा प्रथमच मंचावर येत मनोगत व्यक्त केले व महिलांच्या सक्षमीकरणाची चुणूक दाखवली . याप्रसंगी सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती मार्फत सुरु असलेल्या फळबाग लागवडीला नजीकच्या शेतातून पाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल सौ. रत्नमाला कसारे व विष्णुजी कसारे तसेच सौ. आशा राऊत व दिलीपजी राऊत या शेतकरी दाम्पत्याचा समितीच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच गावातील नागरिकांना गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी वनहक्क समितीची स्थापना करून उत्कृष्ठ काम करीत असल्याबद्दल समितीचे अध्यक्ष भोजराजजी पेंदाम व सचिव रामप्रकाश राऊत यांचा महिला ग्रामसंघा तर्फे सपत्नीक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ.भाग्यश्री ठाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. सारिका राऊत यांनी केले. कार्यक्रमा नंतर उपस्थित पाहुण्यांसह समस्त गावकऱ्यांनी सहभोजनाचा आस्वाद घेतला.

# लाच स्वीकारताना वायरमन जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** नवीन बांधलेल्या घरासाठी मीटर बसविण्यापूर्वी दिलेली दंडाची रक्कम भरावी, त्यानंतरच मीटर मिळेल, असा निरोप दिल्यानंतर कंत्राटी वायरमनने प्रकरण मिटविण्यासाठी एक लाख रुपयांची लाच मागत रक्कम स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मंगळवारी रात्री सापळा रचून अटक केली. प्रशांत जगताप (३३, रा. जळगाव) असे लाचखोर कंत्राटी वायरमनचे नाव आहे. घराचे बांधकाम नुकतेच पूर्ण झाले असून, त्यांनी घराला मीटर बसविण्यासाठी महावितरण कंपनीकडे यापूर्वीच अर्ज केला होता; परंतु त्यांनी मीटर बसविले नव्हते. दरम्यानच्या काळात त्यांच्या घराला महावितरण कंपनीच्या पथकाने भेट दिली होती. भेटीनंतर त्यांना आता दंडापोटी चार लाख ६० हजार रुपये भरले तरच वीजमीटर बसवून मिळेल, असा निरोप कंत्राटी वायरमन प्रशांत जगताप यांनी दिला होता. त्यानंतर तक्रारदारांनी कंत्राटी वायरमन जगताप यांची भेट घेत त्यांच्याशी बोलणी केली. त्या अनुषंगाने एक लाख ६० हजार रुपयांत प्रकरण मिटवतो, असे सांगून लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक सुहास देशमुख यांच्याकडे तक्रार दिली. त्याअनुषंगाने तक्रारीच्या पडताळणीसाठी पोलीस निरीक्षक अमोल वालझाडे, सहायक फौजदार दिनेशसिंग पाटील, सुनील वानखेडे, बाळू मराठे, राकेश दुसाने यांच्या पथकाने मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास सापळा रचला. कंत्राटी वायरमन जगताप यास एक लाखाची रक्कम स्वीकारताना अटक केली.

# सरकार इतके असंवेदनशील कसे?

## जयंत पाटील यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** गेल्या महिन्याभरापासून जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस बेमुदत संपावर गेल्या आहेत. त्यामुळे १ लाख ३४ हजार बालकांचा नियमित आहार थांबला आहे. त्यामध्ये असलेल्या ३९३ कुपोषित बालकांनाही याचा फटका बसला आहे. तसेच ११ हजार ६३८ गर्भवती आणि १२ हजार ८५४ स्तनदा मातांचा आहारही थांबला आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारवर टीका केली आहे. आपल्या एक्स हँडलवर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले आहेत की,



महिन्याभरापासून अंगणवाडी सेविका व मदतनीस बेमुदत संपावर गेल्याने लाखो बालक व महिलांच्या पोषण आहारावर परिणाम झाला आहे. सांगली जिल्ह्यातील ही आकडेवारी धक्कादायक आहे. राज्यभरात परिस्थिती किती हाताबाहेर गेली असेल हा विचारही सुन्न करणारा आहे. सरकार इतके असंवेदनशील कसे?
अंगणवाडी सेविकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांच्यासह समाजातील अन्य घटकांवरही वाईट परिणाम होत आहेत. प्रामुख्याने कुपोषित मुले, गरोदर महिला, स्तनदा मातांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या बालकांवर-महिलांच्या आरोग्यावर परिणाम झाल्यास त्यास जबाबदार कोण? अंगणवाडी सेविकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष का केले जात आहे? असा खडा सवाल त्यांनी केला आहे. शासनाने यावर गांभीर्याने विचार करून तातडीने मार्ग काढला पाहिजे असेही आवाहनही त्यांनी शेवटी केले आहे.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# भोकरला अवैध व्यवसायाचे प्रतिकात्मक दुकान

## भीमटायगर सेनेचे अनोखे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहर व परिसरात मागील अनेक दिवसांपासून अवैध व्यवसाय फोफावले आहेत.संबधीत विभाग मात्र मुग गिळून गप्प बसल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आलें आहेत.या व्यवसायाच्या विरोधात भीमटायगर सेनेच्या वतीने शहरात शौकीनांना अल्पदरात दारू, गुटका,मटका,शिंदी देण्यासाठी दुकान टाकण्याची परवानगी मागून अनोखं आंदोलन करणार असल्याने वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागून आहे. तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरी आणि ग्रामीण भागात मागील अनेक दिवसांपासून शासनाने बंदी घालण्यात आलेला रसायनयुक्त गुटका चढयादरात खुलेआम विक्री केला जातो आहे.शहरात हि विक्रेत्यांनी प्रशासनाला न जुमानता ऊघडमाथ्याने व्यवसाय थाटला असुन लाखोरूपयाची उलाढाल होत आहे. अनेकदा छापे टाकून गुन्हे दाखल करण्यात आले तरी हा व्यवसाय पून्हा जोमाने सुरू आहे. यावर कायमस्वरूपी बंदि घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. विनापरवाना देशी दारू, शिंदिची विक्री सुरू आहे. शिंदिमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतीच्या आखाड्यावर चोरी छुपे पत्याचे क्लब सुरू आहेत. शहरातील मुख्य रस्त्यावर खुलेआम मटका घेतला जात आहे. अशा अवैध व्यवसायाने डोकेवर काढले असताना हि संबंधित विभाग मात्र नाममात्र कार्यवाहि करून व्यवसायास रान मोकळे करून देण्यात धन्यता मानत असल्याचे समजते आहे. व्यवसायात गूंतलेल्या शौकिनांना स्वस्त दरात सेवा देण्यासाठी प्रतिकात्मक दुकान टाकण्याची परवानगी देण्यात यावी आम्ही लवकरच हि सेवा मूख्ख चौकात सूरू करून आंदोलन करणार आहोत असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर जिल्हा अध्यक्ष मिलिंद गायकवाड, राहूल सोनकांबळे, माधव डोंगरे, कांतीलाल जोंधळे, सम्यक सोनूले, विजय गजभारे, भीमराव मस्के, सतीश भवरे,अप्पू शेख युनुस, गजानन टिकेकर याच्या स्वाक्षरी आहेत.



## खामगाव येथे नमो चषक नोंदणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आणि खामगाव येथे शुक्रवार (दि.५) रोजी 'नमो चषक' नोंदणी करण्यात आली. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. आ. हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सजन बागल यांच्या नेतृत्वात फुलंब्री येथे संत सावता माळी विद्यालयात आणि खामगाव येथे श्री. गोरक्षनाथ शिक्षण संस्थेत ही नोंदणी करण्यात आली. यावेळी फुलंब्री तालुकाध्यक्ष सांडु जाधव, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इलियाज शाहा, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब तांदळे, जिल्हा सरचिटणीस ऋषी नरवडे, जिल्हा उपाध्यक्ष विश्वास जगदाळे, जिल्हा चिटणीस अभिलाष सोनवणे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश तांबे, मंगेश जाधव, गणेश जाधव, आवीश जाधव, अजय नागरे, नवनाथ वखरे यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

## बन्नाळी येथे नामविस्तार दिनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** चंद्रसंगीता बहुउद्देशिय संस्था, धर्माबादच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्ताराचा 31 वा वर्धापन दिन दि. 14 जानेवारी रोजी धर्माबाद तालुक्यातील मौजे बन्नाळी येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक शंकरराव वाघमारे बन्नाळीकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यात यावे यासाठी तब्बल सतरा वर्षे संघर्ष करावा लागला. या दरम्यान अनेक भिम सैनिकांना आपला जीव गमवावा लागला. तर अनेक कुटूंब उध्वस्त झाले. एवढा संघर्ष करुनही नामांतर न करता नामविस्तार करुन बहुजनांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम तत्कालीन सरकारने केले होते. नामांतर लढयात शहिद झालेल्या भिमसैनिकांना अभिवादन व विद्यापीठ नामविस्ताराचा जल्लोष असा दुहेरी कार्यक्रम मागील 30 वर्षापासून आयोजित करण्यात येतो. दोन सत्रात चालणाया कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात सकाळी 9.30 वाजता भा.बौ.महासभेचे मा.जि.उपाध्यक्ष जी. पी. मिसाळे यांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येणार असून बौध्दाचार्य सुभाष कांबळे व सदानंद देवके यांच्या हस्ते पुजापाठ करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे दुसरे सत्र सायंकाळी 7 वाजता सुरु करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे उद्घाटक तेलंगाणातील ए.सी. फॉर ए.सी.ज राईट्स संस्थेचे संस्थापक एम. सायलु म्हैसेकर तर वंचित बहुजन आघाडीचे सल्लागार जे.के. जोंधळे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, प्रा. रविंद्र पा. चव्हाण, ॲड. मधुकर परघणे, प्रा. डॉ. पी. जे. थोटे, शिवराज पा. होटाळकर, सा. ना. भालेराव, प्रा. रामचंद्र धावणे, ॲड. कमलेश चौदंते इत्यादी उपस्थित राहणार आहे. तसेच रात्रौ 9 वा. पासून महाराष्ट्राच्या सुप्रसिध्द गायिका सुनिता किर्तने व गायक धम्मा सिरसाट यांचा भिमगीताचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा असे संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## महंत नागराज बाबा महानुभाव यांना अयोध्येच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवीश्वर कुलभूषण आचार्य महंत श्रीनागराज बाबा महानुभाव यांना श्रीराम जन्मभूमी न्यासाचे वतीने आमंत्रित करण्यात आले आहे. येत्या २२ जानेवारी रोजी अयोध्येतील भव्यदिव्य अशा श्रीराम मंदिरात देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत भव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून देशभरात यावेळी जल्लोष होणार आहे. देवगिरी प्रांत छत्रपती संभाजीनगर येथून सनातन हिंदू धर्माचे उल्लेखनीय कार्य करीत आलेले पीठ म्हणजे श्रीनागराज महानुभाव पीठ होय. या पीठावर पहिल्यांदाच एका महिलेची नियुक्ती झाल्याने आणि महानुभाव पंथाचे सामाजिक कर्तव्य समर्थपणे निभावत असलेले महंत श्री नागराज बाबा यांना महानुभाव पंथाचे वतीने श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण प्राप्त झाले आहे. विश्व हिंदू परिषदेच्या वतीने मेटे महाराज यांच्या हस्ते हे निमंत्रण प्राप्त झाले असून महानुभाव पंथाच्या अनुयायांनी या निमंत्रणाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

## अजमेर येथील उत्सवासाठी रेल्वेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**अकोला :** अजमेर येथील ८१२ व्या उर्स उत्सवासाठी रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी हैदराबाद – अजमेर व काचीगुडा – मदार विशेष रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांवर मात्र विशेष भाड्याचा अतिरिक्त भार पडेल. नांदेड, अकोला, खंडवा, भोपाळ, रतलाम, चितोडगढ मार्गे धावणारी गाडी क्र. ०७१२५ हैदराबाद – अजमेर विशेष १५ जानेवारीला हैदराबादवरून १५.०० वाजता सुटेल व बुधवारी अजमेरला सकाळी ०८.३० वाजता पोहचेल. गाडी क्र. ०७१२६ अजमेर – हैदराबाद विशेष २० जानेवारीला अजमेरवरून ०५:३० वाजता सुटेल व रविवारी हैद्राबादला दुपारी १५:३० वाजता पोहचेल. गाडी क्र. ०७१२९ काचीगुडा – मदार विशेष १५ जानेवारीला काचीगुडावरून २३:४५ वाजता सुटेल व बुधवारी मदारला १७:४५ वाजता पोहचेल. गाडी क्र. ०७१३० मदार – काचीगुडा विशेष २० जानेवारीला मदारवरून १:४० वाजता सुटेल व सोमवारी काचीगुडाला सकाळी ०४:३० वाजता पोहोचेल.

## १८ वर्ष पूर्ण झालेल्यांनी मतदान नोंदणी करा : तहसीलदार स्वरूप कंकाळ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सुलीभंजन येथे विशेष शिबिराचे आयोजन करून नव मतदारांची जनजागृती करण्यातआली. चिश्तीया महाविद्यालय खुलताबाद यांच्या वतीने सुलीभंजन या गावी दिनांक 9 जानेवारी ते 15 जानेवारी 2024 पर्यंत विशेष शिबीराचे आयोजन केलेले आहे.या शिबिराचे उद्घाटक म्हणून डॉ.ज्ञानेश्वर पाथ्रीकर जिल्हा सन्मवयक होते .तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार स्वरूप कंकाळ हे होते .तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष शेख महम्मद अय्युब हे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ.अब्दुल मुकीत, ॲड. कैसरोद्दीन , ॲड.मुकीमोद्दीन खमर ,शरफोद्दीन रमजानी,देविदास बागुल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कादरी सय्यदा अर्शिया, शेख अबू मोहम्मद, डॉ.शेख एजाज, अविनाश नेवेकर,इत्यादी होते. उद्घाटन पर भाषणात डॉ.पाथ्रीकर यांनी एनएसएस इतिहास सांगितला त्याचबरोबर एनएसएस हे विद्यार्थी घडवतो. समाज जीवन घडवण्याचा ध्यास एन. एस.एस.चे घेतात. समाजातील समस्या समजवून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न एन.एस.एस.चे स्वयंसेवक करत असतात संकटास समोर जाण्याची ताकद युवकात असली पाहिजे असे प्रतिपादन केले.यावेळेस प्रमुख पाहुणे स्वरूप कंकाळ तहसीलदार यांनी एनसीसीचे स्वयंसेवक हे उत्कृष्ट काम गावात करत आहेत व आज एनएसएस तर्फे तीन वर्षासाठी दत्तक गाव घेतले जाते.त्या गावातील विद्यार्थी व गावकरी संवाद साधतात. याचबरोबर त्यांनी ज्यांची 18 वर्षे पूर्ण झाले हे त्यांनी मतदान नाव नोंदणी करण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर त्यांचे मतदार यादीत नांव आहे त्यांनी आपलं मतदान करून लोकशाही बळकट करण्याचा आव्हान यावेळी त्यांनी केले. यावेळेस राजेश राठोड यांनी मतदान ईव्हीएम मशीन व्दारे मतदान प्रक्रिया प्रत्याक्षीक दाखवले. यावेळी ॲड.मुकीमोद्दीन खमर, ॲड.कैसरोद्दीन,




प्राचार्य कादरी सय्यदा अर्शिया यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.खान हमीदा यांना पीएच डी गाईड पि.जी. टिचर्स म्हणून मान्यता मिळाली त्याबद्दल पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम सूत्रसंचालन प्रा.सुनिल जाधव यांनी केले तर आभार डॉ.सिद्दीकी अफरोजा खातून यांनी मानले. यावेळेस प्रा.शैलेंद्र भनगे,डॉ.शेख अफसर ,डॉ.मोहम्मद अली ,डॉ. शिल्पा देशपांडे डॉ.हरी जमाले ,डॉ. अशोक भालेराव डॉ.सुभाष बागल ,डॉ. आसाराम पवार, प्रा. शेख तब्बसुम, प्रा.सायली शेटे डॉ.शेख नुरजहाँ, प्रा. अलमास बानो,प्रा.शेख फैजान, भगवान घुसळे, राजू गुंजाळ,हाशम शाह, शेख जहीर ऊपस्थित होते.

# विद्यार्थी हाच देशाचे उज्ज्वल भविष्य

## ॲड. मेघा भाले : आ. धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त नोटबुक वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संस्कार देवून उत्तम नागरीक घडविणे हे शिक्षकाचे कर्तव्यच आहे. विद्यार्थी हाच देशाचे उज्ज्वल भविष्य आहे असे प्रतिपादन बल्लारपूर काँग्रेस महिला विभागाच्या शहराध्यक्ष ॲड. मेघा भाले यांनी विसापूरात आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थांना नोटबुक वाटप दरम्यान केले आहे.

काँग्रेस नेत्या वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तसेच चंद्रपूरचे माजी सभापती काँग्रेस नेते दिनेशभाऊ चोखारे यांच्या मार्गदर्शनात विसापूर येथील जिल्हा परिषद प्राध्यमिक शाळेतील विद्यार्थांना नोटबुक वाटप करण्यात आले.



यावेळी बल्लारपूर काँग्रेस महिला विभागाच्या तालुका अध्यक्ष अफसान सय्यद, बल्लारपूर काँग्रेस महिला विभागाच्या शहराध्यक्ष ॲड. मेघा भाले मॅडम, बल्लारपूर काँग्रेस महिला विभागाच्या शहर उपाध्यक्ष ममता चंदेल, सामाजिक कार्यकर्त्या संगीता विलास बावणे, सुष्मा तिरुपती गिरडकर, शाळेच्या मुख्याध्यापिका कलावती वानखेडे, इतर शिक्षिका लीलावती नंदुरकर, नीता वासाडे, मीनाक्षी कुंभारे, विना वैरागडे, स्वाती मेश्राम तसेच शिक्षक, विद्यार्थी, शाळेतील कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या कि, विद्यार्थी हाच देशाचा उज्ज्वल भविष्य आहे, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संस्कार देवून उत्तम नागरीक घडविणे हे शिक्षकाचे कर्तव्यच आहे. तसेच आपल्या शाळेतील खेळांडूनी जगात नांव लौकीक करावे असे आवाहन ॲड. मेघा भाले यांनी केले आहे. काँग्रेस नेत्या वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थांना नोटबुकलस चॉकलेट वाटप करण्यात आले.

# भरधाव दुचाकीची ट्रकला धडक

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकवर भरधाव दुचाकी धडकून झालेल्या भीषण अपघातात एकाच नातेसंबंधातील तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. गडचिरोली-चंद्रपूर मार्गावरील मुरखळा गावाजवळील वळणावर मंगळवारी रात्री ८ ते ९ वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. अक्षय दसरथ पेंदाम (२३), अजित रघू सडमेक (२३), अमोल अशोक अर्का (२०) सर्व राहणार गोविंदगाव अशी मृत तरुणांची नावे आहेत. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जानेवारी रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास अक्षय, अजित आणि अमोल नुकत्याच घेतलेल्या नव्या दुचाकीवरून भरधाव वेगाने गडचिरोलीच्या दिशेने येत होते. दरम्यान, मुरखळा गावाजवळच्या वळणावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकवर त्यांची दुचाकी धडकली. यात तिघांचाही जागीच मृत्यू झाला. हा अपघात एवढा भीषण होता की दुचाकीचे दोन तुकडे झाले. मृत तरुण अहेरी तालुक्यातील गोविंदगावचे रहिवासी होते. तसेच एकाच नातेसंबंधातील असल्याचे कळते. घरातील तरुण मुलांच्या अपघाती निधनाने कुटुंबीयांना शोक अनावर झाला होता. यातील एकाचे वडील पोलीस विभागात कार्यरत आहेत. अपघाताची माहिती मिळताच रात्री जिल्हा सामान्य रुग्णालयात मोठी गर्दी झाली होती.

# न.प.चे ढिसाळ कामकाज; तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** विधानसभा आमदार लोकप्रिय सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा अनुसूचित जाती व भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा यांच्या नेतृत्वात सुमित सूर्यवंशी व सय्यद फेरोज न.प.जिंतूर येथील सर्व सामान्य नागरिकांचे कामे होत नसल्या विषयास जिंतूर नगर परिषद येथून शहरातील सर्व सामान्य नागरिकांचे रोजच काम पडत असते.न.प.च्या माध्यमातून वेगवेगळ्या घरकुल योजना असतील नामांतर असेल.बांधकाम परवाना असेल पाणी पुरवठा असेल किरकोळ लाईट बिल दुरुस्ती असेल किंव्हा नागरिकांना स्वतःचा कर भरावयाचा असेल त्या साठी न.प.मध्ये जावे लागते परंतु असे निदर्शनास येत आहे कि,नागरिकांना न.प.मध्ये कोणत्याही विभागामध्ये कोणत्याही वेळेवर कर्मचारी आढळून येत नाही. तसेच भेट झाल्यास उडवा उडवीची उत्तरे दिली जातात त्यामुळे नागरिकांच्या कामाची हेळसांड होत आहे.घरकुल योजने मध्ये तर कामाचा समान टप्पा असेल एकाच वेळेस मंजुरी असेल तरी पण काहींनाच घरकुल चे हप्ते मिळतात. काहींना तर घरकुल पूर्ण झाले तरी योजनांचा एक हि हप्ता मिळाला नाही. घरकुल विभागात चीरीमिरी घेतल्या शिवाय कामच होत नाही अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. व तसेच न.प.मध्ये पूर्ण वेळ मुख्याधिकारी नसल्यामुळे कर्मच्यार्यावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही.म्हणून निवेदन करतो कि न.प.ला पूर्ण वेळ मुख्याधिकारी मिळावा व नागरिकांची होत असलेली हेळसांड थांबावी नाही तर या पुढे उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. या वेळी उपस्थिती पद अधिकारी माजी नगराध्यक्ष डॉक्टर पंडित दराडे, मुसाभाई कुरेशी, विजयकुमार वाकळे, आकाश चराटे, बंटी जाधव, अमिन पठाण, संतोष भाऊ राठोड, शहरातील उपस्थितीत नागरिक.






# भंडारा उधळत विकसित भारत संकल्प यात्रेचे जेजुरीत स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** नगरपरिषद पालखी मैदान येथे भंडाऱ्याची उधळण करीत विकसित भारत संकल्प यात्रेचे स्वागत करण्यात आले. जेजुरी नगर परिषदेच्या वतीने आणि विकसित भारत संकल्प यात्रेच्या अनुषंगाने विविध शासकीय योजनांची माहिती देणाऱ्या चित्रफीत रथाचे उदघाटन जेजुरी नगरपरिषद मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले यांचे हस्ते करण्यात आले याप्रसंगी जिल्हा उद्योग अधिकारी सतीश खरात,.आकाशवाणी पुणे चे सुर्वेशे आणि कुलकर्णी साहेब तसेच ग्रामीण रुग्णालया चे आरोग्य सहायक व्ही एस मोरे,ऐ के शिंदे, भाजपाचे गणेश भोसले भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य अलका शिंदे आदी मान्यवर उपस्तिथ होते. स्वच्छ भारत, पी एम स्वनिधी, घरकुल आवास योजना, ग्रामीण रुग्णालय, आयुष्यमान भारत योजना, उज्वला गॅस, योजनाचे स्टॉल लावण्यात आले. त्यावेळी विविध योजना बाबत लाभार्थी यांना मार्गदर्शन करण्यात करण्यात आले पदाधिकारी आणि सर्व पक्षीय पदाधिकारी यावेळी उपस्थित होते यांच्यासह कार्यक्रमाला सेना जेजुरी शिवसेनेचे विठ्ठल सोनवणे,शहर फेरीवाला समिती सदस्य लतिफा,मनेर,जयश्री रोमन,जाणीव होकर्स संघटना अध्यक्ष,निलेश भुजबळ अखिल भारतीय ग्राहक पंचायत पुरंदर तालुका अध्यक्ष प्रसाद अत्रे, ,जेजुरी शहर अध्यक्ष गणेश भोसले सरचिटणीस विक्रम माळवदकर सरचिटणीस चंद्रकांत जगताप महिला आघाडीचे अध्यक्ष उमाताई कुंटे महिला पुरंदर तालुका अध्यक्ष मंगल पवार, ग्रामीण रुग्णालयाचे डॉ अजय क्षीरसागर,, निलेश शेजवळ, पूजा यादव , नगर परिषद चे राजेंद्र गाढवे,बाळू खोमणे,वंदना चिव्हे, सोनल गवते,अमर रणवरे,गणेश गरुड,शुभम लाखे,जयदीप लाखे,तसेच CSC च्या सिमा माने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले सदर वेळी जेजुरी शहर उपाध्यक्ष विजय पवार गीता यादव घोडके छाया तांबे,विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सदरील वेळी प्रधान मंत्री स्वनिधी लाभार्थी,बचत गटाच्या पदाधिकारी सदरील कार्यक्रमाला उपस्थित होत्या. यावेळी विकसित भारत संकल्पाची शपथ नागरिकांनी घेतली. यावेळी विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त विविध शासकीय योजनांची माहिती देणारे चित्रपट दाखविण्यात आले. अनेक लाभार्थ्यांनी नावे नोंदवून लाभ घेतला.तसेच ज्या लाभार्थींना योजनेचा लाभ घेतला त्यांची मुलाखत सुद्धा घेण्यात आली.

# रेल सीतागड येथे हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** मौजे रेल (सितागड) येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वर पारायण सोहळ्यास दि.९ प्रारंभ झाले असुण दि.१६ काल्याच्या किर्तनाने तथा महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. सप्ताहात सप्ताहभर भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन असुण अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ३५ वे वर्ष आहे. सप्ताहात किर्तन कार म्हणून हभप ज्ञानेश्वर मधाळे, सोमीनाथ खाबंट, पंढरीनाथ तावरे, महादेव निपाणीकर, पंडित क्षिरसागर, ज्ञानेश्वर पवार, चांगदेव काकडे आदि किर्तन करणार आहे तर काकडा भजन, ज्ञानेश्वर पारायण, गाथा भजन, हरिपाठ, हरिकिर्तन होईल.तर हभप उध्दव म.आनंदे (पालकी चालक देवगिरी) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे तद्नंतर महाप्रसाद (भंडारा) ने सप्ताहाची सांगता होणार आहे.याचा गाव व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ तथा भजनी मंडळ यांनी केले आहे.

# भाविकांच्या सुविधांबाबत पुरंदर आमदारांची आग्रही भूमिका; गडदुरुस्तीच्या कामांना वेग

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**जेजुरी :** भारतीय लोकदैवत असलेल्या महाराष्ट्र कुलदैवत जेजुरीच्या खंडोबा गडाच्या जीर्णोद्धार नूतनिकरण विकास कामना गती आली असून या विकास कामान बरोबर राज्य आणि राज्यबाहेरून येणाऱ्या भाविक पर्यटकांना ही सोय सुविधा मिळण्या बाबत पुरंदर तालुक्याचे आमदार संजय जगताप यांनी आग्रही भूमिका ग्रामस्थ, देवसंस्थान मानकरी शासकीय अधिकारी, मंडळीच्या जेजुरीत आयोजित बैठकीत मांडली. महाराष्ट्र शासनाकडून तिर्थक्षेत्र जेजुरी विकास आराखडयासाठी ३५९ कोटी रुपये मंजूर असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील १०९ कोटींच्या निधीतून विकास कामांबरोबरच येणाऱ्या भाविकांना सर्व सुविधा मिळाव्यात अशा पद्धतीने कामे करणे आवश्यक असल्याचे पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांनी सांगितले. याबाबत जेजुरी गड, कडेपठार आणि जेजुरी परीसरातील विकास कामांच्या नियोजनाबाबत शुक्रवारी (दि. ५) सासवड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रांती गृहात आमदार संजय जगताप यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. याप्रसंगी पुरातत्व विभागाचे उपसंचालक विलास वाहने, वास्तूविशारद तेजस्वीनी आफळे, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, बांधकाम विभागाच्या अभियंता स्वाती दहिवाल, श्री मार्तंड देव संस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. विश्वास पानसे, ॲड पांडुरंग थोरवे, डॉ राजेंद्र खेडेकर, माजी नगरसेवक सचिन सोनवणे, माजी मुख्य विश्वस्त सुधीर गोडसे, ग्रामस्थ हेमंत सोनवणे, संतोष खोमणे, रामचंद्र भापकर, पंडीत हरपळे, छबन कुदळे, गणेश आगलावे आदी उपस्थित होते. याप्रसंगी जेजुरी गड, दर्शनबारी, दिपमाळा, कमानी, ट्रस्टचे कार्यालय, जानुबाई मंदिर, बल्लाळेश्वर मंदिर, पेशवे तलाव, होळकर तलाव, लवथळेश्वर मंदिर, कडेपठार मंदीर परीसरातील कामे सुशोभीकरण, गावातील पालखी मार्ग, कडेपठारचे दोन्ही पायरी मार्ग आदींच्या कामांबाबत नियोजनाची चर्चा करण्यात आली. दर्शनबारी आणि चिंचेच्या बागेच्या जागेबाबत देवस्थानचे ट्रस्टी, मानकरी, नगरपरिषद यांची एकत्रित बैठक घेऊन नियोजन करणे. होळकर तलावाच्या व बाजुच्या जागेची मोजणी करून भूसंपादन करणे. होळकर तलाव परिसरात राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारक, दशक्रिया विधी घाट आदी कामांचा आराखडा करणे. तसेच कडेपठारावर गडकोट आणि सुशोभीकरणाच्या कामांबाबत चर्चा करण्यात आली.



# तूर - हरबऱ्याच्या उत्पादनात होणार मोठी घट

## ढगाळ वातावरण आणि धुक्यामुळे : भाजीपाल्याचेही नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात पावसाचा मोठ्या प्रमाणात खंड पडल्यामुळे शेतकऱ्याला सोयबिन पिकामध्ये मोठ्या प्रमाणात फटका बसला होता. हातातोंडाशी आलेले पिक गेल्याने शेतकरी हवालदिल झाला होता, मात्र खरीप गेल्यानंतर रब्बी पिंकावर आशा होती. मात्र जिल्हात काही दिवसापासून ठगाळ वातावरण असल्यामुळे तूर, हरबरा, कपाशी पिकामध्ये मोठ्या प्रमाणात घट होण्याची शक्याता शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे. गेल्या तीन चार दिवसापासून जिल्ह्यात थोड्या फार प्रमाणात पाऊस असल्याने सर्वत्र ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे आज सकाळी सर्वत्र धुक्यांचे चांदर परसलेली आहे. त्यामुंळे हरभरा तुर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यात निर्माण झाली आहे. तसेच बदलत्या वातावरणामुळं पिकांवर पडत असलेल्या रोगराईमुळं शेतकऱ्यांच्या पिकांचा उत्पादन खर्च वाढत आहे. अवकाळी पावसानंतर आज दाट धुक्याची चादर पसरलेली आहे.

रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागात काल रात्री थोड्या फार प्रमणात पाऊस झाल्याने आज सकाळी सर्वत्र धुके पसरले आहे. त्यामुळे आता आता पुन्हा एकदा शेतकरी मोठ्या संकटा सापडला आहे. आधीच सोयबीन पिकांचे येलो मोज्याक रोगामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्याचे लक्ष रब्बी पिकावर होते, मात्र बद्दलत्या वातावरणामुळे पुन्हा एकदा शेतकरी मोठ्या प्रमाणात संकटात सापडला आहे.





सोयबिन पिंकाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झोले होते, त्यामुळे आम्हाला मोठा फटका बसला होता . तसेच उरलेसुरले या सरकारच्या धोरणामुळे सोयबिनचे भाव चार हजावर आणले आहेत . मात्र यावर्षी तूर पिकाला चांगले भाव आहेत, मात्र बद्दलत्या वातावरणामुळे तूर हरभरा पिकामध्ये मोठ्या प्रमाणात घट होण्याची शकत्या आहे .
**ज्ञानेश्वर खडसे ( शेतकरी खडकी सदार )**



आज सकाळी मोठ्या प्रमाणात धुके आले आहे . त्यामुळे भाजीभाल तूर, हरभरा पिक मोठ्या संकटात सापडले आहे . आधीत सोबिनचा उत्पादन खर्च सुद्धा निघालेला नाही, त्यात पुन्हा हे नविन संकट आमच्या समोर उभे राहले आहे . अजून काही दिवस असेच वातावर राहले तर आमच्या उत्पादन खर्च सुद्धा निघणार नाही . निसर्गाच्या लहरी पणा आणि सरकारचे आडमुठ्या धोरणामुळे आमचे कंबरडे मोडेले आहे . थोड्या फार प्रमाणात सोयबिनचे पिक झाले होते . त्याला सुद्धा योग्य भाव न दिल्यामुळे आमच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहीला आहे . **विठ्ठल काकडे ( शेतकरी येवता )**



# आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील बाजारपेठ मधील विठ्ठल रुक्मिणी मंदिरा सभामंडपाचे भूमिपूजन मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सावजी रवींद्र जोशी विजय रोजेकर किरण भावसार विनायक सावजी यांच्या हस्ते आ. सतीश चव्हाण यांचा शॉल श्रीफळ व विठ्ठल रुक्मिणी मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला यावेळी तालुकाध्यक्ष अनिल चव्हाण, किरण भावसार दिगंबर चव्हाण विलास सावजी विनोद चौधरी विवेक कायस्थ गणेश सावजी अक्षय खरोटे नागेश कायस्थ पुष्कर सावजी ज्ञानेश्वर दुधारे शहराध्यक्ष गजानन फुलारे माजी शहराध्यक्ष मुजबुद्दीन, भगवान कामठे, केशव जाधव युवक तालुकाध्यक्ष विनोद जाधव रावसाहेब फुलारे ओबीसी सेलचे जिल्हा संघटक मिठू मालकर. तालुकाध्यक्ष अक्षय खरोटे इसाक कुरेशी आजीज शेख अरुण तंबारे मयूर फुलारे जावेद शेख युवक शहराध्यक्ष आदीब शेख मुजाहिद कुरेशी यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिवाळ्यात पावसाळा, धुके, गारवा, थंडी, ढगाळ वातावरण

## दैनंदिन जीवनावर व्यवहारांवर परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** पावसाळ्यात निव्वळ ढगाळ वातावरण व नाममात्र पाउस झाले.तर सद्या हिवाळा सुरू असुण हिवाळ्यात पावसाळा धुके गारवा थंडी ढगाळ व दुषित वातावरण असे विचित्र प्रकार व चक्र सुरू आहे.

वर्ष -२०२३ मधे नाममात्र पाऊस झाला म्हणजे सरासरी पेक्षाही कमी त्यात निव्वळ ढगाळ वातावरण अधूनमधून पाऊस झाला. तर सद्या हिवाळा सुरू यात पावसाळाचे चित्र आहे.सतत ढगाळ व दुषित वातावरण अधूनमधून अवकाळी पाऊस थंडी गारवा असे विचित्र प्रकार सुरू आहे.यामुळे वृध्द बालके परेशान झाले आहे. यात थंडी ताप पडसा खोकला अंगदुखी आदि दुःखने सुरु आहे.तर विचित्र दुषित वातावरणामुळे रब्बी पिक हंगाम मधील गहु हरभरा मका ज्वारी व हिरवे भाजीपाला याला फटका बसत आहे. या दुषित वातावरणाचा नागरिकांच्या दैनंदिन जीवन तथा व्यवहारांवर परिणाम होत आहे.



बाजार सावंगी येथे श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली दिनांक 8रोजी रात्री ह.भ.प.आदिनाथ महाराज फपाळ यांचे जाहीर कीर्तन झाले त्यानंतर दि. नऊ रोजी सकाळी रेणुका माता मंदिर परिसरात संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची पूजा करून त्यानंतर भव्य असा महाप्रसादाचा कार्यक्रम रेणुका माता मंदिर परिसरात आयोजित करण्यात आला होता यावेळी राजेंद्र सोनवणे, उत्तम गवळी, अंबादास गवळी,सुरेश गवळी, देविदास सोनवणे, रमेश गवळी, गणेश सोनवणे, भाऊसाहेब गवळी,पांडूरंग सोनवणे, सचिन गवळी तथा तिळवण तेली समाज बांधव यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर